

'मला आई व्हायचं नाहीये' मातृत्वाबद्दल स्पष्ट बोलली 'तारक मेहता...' फेम बबिता

(पान ६ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



अकोल्यात भाजपला रोखण्यासाठी रणनीती!

(पान ३ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatanngp@gmail.com | शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ | अंक : १६९ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### आक्षेप घेणाऱ्यांचा नियमांचा अभ्यास नाही: ठाकरे गटावर भाजपचा पलटवार

मुंबई - राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौरपदासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले असून, या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत मंत्रालयात आरक्षण सोडत पार पडली. या सोडतीत मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख महानगरपालिकांसह छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, नागपूर आणि नांदेड-वाघाळा या महापालिकांचे महापौरपद खुल्या वर्गातील महिलांसाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला उमेदवारासाठी आरक्षण जाहीर झाल्याने, देशातील सर्वात मोठ्या महापालिकेवर आता महिला नेतृत्व असणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. मुंबई महापालिकेच्या आरक्षणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. कारण मुंबई महापालिका ही आर्थिकदृष्ट्या देशातील सर्वात श्रीमंत महापालिका मानली जाते, तसेच महापौरपदाला राजकीय आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे. आरक्षण जाहीर होताच, मुंबईतील नगरसेवकांच्या संख्याबळाचा विचार करता, महापौरपद महायुतीमधील भाजपकडे जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मुंबईत महिला महापौर तर असणारच, पण त्या भाजपकडून असण्याची शक्यता अधिक असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.आरक्षण जाहीर झाल्यानंतर भाजप नेते अमित साटम यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना महिला नेतृत्वाचा ठामपणे पुरस्कार केला.

### जम्मूत सैन्याची गाडी 400 फूट खोल दरीत कोसळली



जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात गुरुवारी लष्कराचे वाहन 400 फूट खोल दरीत कोसळले. यात 10 जवान शहीद झाले, तर 11 जणांना एअरलिफ्ट करून उधमपूर मिलिटरी हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले आहे.लष्कराच्या अधिकाऱ्याने सांगितले की, वाहनात 21 जवान होते. सर्वजण डोडा येथून वरच्या चौकीकडे जात होते. भद्रवाह-चंबा आंतरराज्यीय रस्त्यावर खन्नी टॉपजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा म्हणाले की, या अपघातामुळे मी दुःखी आहे. या कठीण प्रसंगी, संपूर्ण देश शोकाकुल कुटुंबांच्या पाठीशी एकजुटीने आणि समर्थनाने उभा आहे.जखमी सैनिकांना एअरलिफ्ट करून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना उत्तम उपचार सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. जम्मू-काश्मीरमधील किश्तवाडमध्ये दहशतवाद्यांच्या शोधादरम्यान 18 जानेवारी रोजी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली होती. यावेळी 8 जवान जखमी झाले होते. त्यापैकी एका जवानाचा 19 जानेवारी रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. शहीद जवानाची ओळख हवालदार गजेंद्र सिंह अशी झाली होती.

# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका!:३० लाख कोटींचे सामंजस्य करार

## १८ देशांमधून गुंतवणूक; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई/दावोस- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोसच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी इथून महाराष्ट्रात किती गुंतवणूक आली आहे तसेच राज्याच्या कोणत्या भागात व कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक आली आहे, यांची माहिति देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, दावोस दौरा यह अतिशय यशस्वी झाला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की जवळपास गुंतवणुकीचे करार जे केले आहेत ते 30 लाख कोटी रुपयांचे आहेत. अजून 7-10 लाख कोटी पुढच्या काळात होणार आहे. ही जी काही गुंतवणूक आहे, यात इंडस्ट्री सेक्टर आहे, सर्व्हिस सेक्टर आहे, कृषी क्षेत्र आहे, सगळ्याच क्षेत्रात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यातील 83 टक्के जे काही करार आहेत, यात एफडीआय आहे. 16 टक्के गुंतवणूक अशी आहे ज्यात फायनॅनष्यल इंस्टीट्यूट असतील किंवा टेक्निकल आहेत, या गुंतवणुकी एफडीआय कमी आहे, पण फॉरेन टेक्नॉलजी आहेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकूण किती देशातून गुंतवणूक आपल्याकडे येत आहे, याचा हिशोब लावला तर एकूण 18 देशातून ही गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यात अमेरिका, यूके, स्वित्झर्लंड, स्वीडन, सिंगापुर, नेदरलँड, जपान, इटली, यूएई, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलंड, स्पेन, कॅनडा, बेल्जियम, ऑस्ट्रीया, अशा अनेक देशांतून गुंतवणूक येत आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राचे परफॉर्मेंस सगळ्यात चांगला राहिला आहे. एक प्रकारे या कागदावरच्या घोषणा नाहीत. अनेकवेळा लोकांचा गैरसमज होत असतो, या गुंतवणुकीचा कालावधी जो



असतो, हा 3 वर्षांपासून ते 7 वर्षांपर्यंत असते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, अनेक मोठ्या कंपन्या आपल्याकडे गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. यासोबत कुठल्या क्षेत्रात गुंतवणूक येत आहे ते देखील महत्त्वाचे आहे. यात क्वांटम कम्प्यूटिंग, एआय डेटा सेंटर, एआय टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, फॅब सेमीकंडक्टर्स, जीसीसी, आपल्याकडे नवीन वेव ही जीसीसीची आहे. तसेच फूड प्रोसेसिंग, रिनिवेबल एनर्जि, ग्रीन स्टील, ईव्ही, अर्बन ट्रांस्फॉर्मेशन, शिप बिल्डिंग, एड्युकेशन, फीनटेक, मॅजिस्टिक आणि टेक्सटाइल तसेच डिजिटलमध्ये गुंतवणूक आली आहे.

आता गुंतवणूक आली कुठे ? तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. कोकणचे क्षेत्र असेल किंवा एमएमआरचे क्षेत्र आहे, विदर्भात 13 टक्के गुंतवणूक आली आहे, 50 टक्के गुंतवणूक महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये आली आहे. यावेळी उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार आणि धुळे या सगळ्या भागांमध्ये गुंतवणूक आली आहे. मराठवाड्याचे जे नवीन मॅगनेट तयार झाले आहे, ते आहे छत्रपती संभाजीनगर, याही ठिकाणी जवळपास 55 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे.

नागपूर विभाग तसेच विदर्भ जो आहे, त्या ठिकाणी जवळपास 2 लाख 70 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. याचसोबत पुणे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये देखील चांगली गुंतवणूक आली असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

# मुख्यमंत्री असहाय्य आहेत का? महाड प्रकरणी हायकोर्टाचा संताप:मंत्र्याच्या मुलाला अटक नाहीच..

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई -महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या राड्याप्रकरणी मुख्य आरोपींना अटक करण्यात आलेल्या अपयशावर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणात मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले याच्यासह इतर आरोपी अजूनही मोकाट असल्याने न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुख्यमंत्री इतके असहाय्य झाले आहेत की या प्रकरणात त्यांना काहीही करता येत नाही, अशा कठोर शब्दांत उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवत, मुख्यमंत्री आणि



मंत्री भरत गोगावले यांच्याकडून थेट निर्देश घ्या, अशा सूचना सरकारला दिल्या आहेत. या निरीक्षणामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात विकास गोगावले याच्यासह त्यांचा पुतण्या महेश गोगावले, माजी आमदार माणिक जगताप यांचा मुलगा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते श्रीयांश जगताप यांच्यावरही गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतरही आरोपींना अटक होत नसल्यामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सरकार गंभीर आहे की केवळ वेळकाढूपणा करत आहे, असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे.महाड राडा प्रकरणी बोलताना उच्च न्यायालयाने सरकारला शब्दांतच फटकारले. सरकारला अटक करायची असेल तर 24 तासांत कोणालाही अटक होऊ शकते. मात्र, जेव्हा अटक करायची नसते, तेव्हा अशी प्रतिज्ञापत्रं सादर केली जातात, असे परखड निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या विधानातून सरकारवर दबाव आणत, कायद्याची अंमलबजावणी निवडक लोकांसाठी वेगळी आहे का, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

# राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांचे आरक्षण जाहीर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई - राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून 29 महापालिकांपैकी 15 महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज उपस्थित होते. नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी 8 पदे आरक्षित झालेली असून, त्यापैकी 4 पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत.उर्वरित 17 महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी 9 पदे येत असून, त्यापैकी 8 पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. महापौर पदासाठी आरक्षण अनुसूचित जमातीसाठी राखीव महापालिका – कल्याण-डोंबिवली अनुसचित जातीसाठी राखीव महापालिका - ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला). नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला आरक्षण) - जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला. नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) – पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर, सर्वसाधारण महिला आरक्षण – पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा- भाईंदर, नागपूर, नाशिक. सर्वसाधारण प्रवर्ग - छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.




# नागपूर महापौरपद महिलांसाठी खुले; अतकरे, लड्डा, दाणी, बांतेमध्ये चुरस


**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नागपूर - महाराष्ट्रातील महापालिकांच्या महापौरपदासाठी मंगळवारी आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या सोडतीनुसार नागपूर महानगरपालिकेचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाले आहे. त्यामुळे नागपूरला पुढील महापौर महिला असणार हे निश्चित झाले आहे.

महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्याने राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. भाजपकडून मनीषा अतकरे, संतोष लड्ढा, शिवानी दाणी आणि विशाखा बांते या नावांची चर्चा जोरात सुरू आहे. पक्षांतर्गत गणिते, संघटनात्मक अनुभव आणि प्रादेशिक समतोल लक्षात घेता अंतिम नावावर निर्णय होणार असल्याचे संकेत आहेत.

महत्त्वाचे म्हणजे पूर्व नागपूर आणि दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातून भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आल्याने, या भागातूनच महापौर होण्याची शक्यता अधिक वर्तवली जात आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांचे प्रयत्न वाढले असून पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठींना वेग आला आहे.दरम्यान, राज्यातील एकूण २९ महापालिकांसाठी महापौरपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि खुल्या प्रवर्गाचा समावेश आहे. नागपूरसह मुंबई, पुणे, ठाणे, औरंगाबाद, अमरावती, जळगाव, नाशिक आदी महापालिकांतील आरक्षणामुळे स्थानिक राजकारणात मोठे बदल घडणार आहेत.

नागपूरमध्ये महापौरपद महिलांसाठी खुले झाल्याने महिला नेतृत्वाला संधी मिळणार असून, आगामी महापालिका निवडणुकीत याचा मोठा प्रभाव दिसून येणार आहे.



# सांगलीच्या वाळव्यात खळबळ!:स्व. राजाराम बापूंच्या प्रतिमेला टाचण्या टोचल्या, लिंबू फिरवत भानामतीसारखे कृत्य


**दिव्य वतन /वृत्तसेवा**

सांगली- महापालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. मात्र, ही तयारी सगळ्याच पद्धतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. यात करणी आणि काळी जादूचा मार्गही अवलंबला जात असल्याचे समोर आले आहे. आता सांगलीत जीवंत नव्हे तर चक्क मृत व्यक्तीच्या फोटोवर करणी केल्याचे उघड झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येल्लूर येथे एक अत्यंत निंदनीय आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. राज्याचे माजी मंत्री जयंत पाटील यांचे वडील आणि ज्येष्ठ नेते दिवंगत राजाराम बापू पाटील यांच्या प्रतिमेला टाचण्या टोचून आणि लिंबू फिरवून करणी-भानामतीसारखा अघोरी प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. एका कर्तृत्ववान लोकनेत्याच्या प्रतिमेबाबत घडलेल्या या कृत्यामुळे राजकीय वर्तुळासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, जनतेतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या राज्यात जिल्हा परिषद निवडणुकीचे रणकंदन माजले असून प्रचार शिगेला पोहोचला आहे. राजकीय आखाड्यात आरोप-प्रत्यारोप होणे स्वाभाविक असले, तरी पुरोगामी विचारांचा वारसा सांगणाऱ्या सांगली जिल्ह्यात अशा प्रकारे अंधश्रद्धेचा आधार घेणे हे धक्कादायक मानले जात आहे. राजकारणातील वैचारिक लढाई लोकशाही मार्गाने लढण्याऐवजी अशा प्रकारची हीन कृत्ये केल्यामुळे जिल्ह्याच्या सुसंस्कृत प्रतिमेला तडा गेला असल्याची चर्चा आता सर्वत्र रंगली आहे.

येल्लूरमध्ये दिवंगत राजाराम बापू पाटील यांच्या प्रतिमेवर करण्यात आलेल्या अघोरी प्रकारामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विशेष म्हणजे, ज्या भागात ही घटना घडली, तिथे भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या वहिनी हर्षाली राहुल महाडिक या जिल्हा परिषदेची निवडणूक



लढवत आहेत. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून तगडे आव्हान उभे केले जाणार आहे. या हाय-व्होल्टेज निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची घटना घडल्याने परिसरात तणावाचे वातावरण असून, राजकीय संघर्षाला आता वेगळे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या वादाला गेल्या काही दिवसांतील राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी देखील आहे. काही काळापूर्वीच भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी माजी मंत्री जयंत पाटील यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका करताना राजाराम बापू पाटील यांच्याबद्दलही वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्या घटनेमुळे जिल्ह्यात आधीच मोठा असंतोष निर्माण झाला होता. आता पुन्हा एकदा बापूंच्या प्रतिमेबाबत अशा प्रकारे हीन कृत्य करण्यात आल्याने हा वाद अधिक चिघळण्याची चिन्हे आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीत वैचारिक लढाईऐवजी अशा प्रकारच्या अघोरी कृत्यांचा वापर होत असल्याबद्दल सामान्य जनतेतूनही संताप व्यक्त केला जात आहे.

सांगली जिल्ह्यातील जत शहरात नगरपालिका निवडणुकीच्या धामधुमीत काळ्या जादूचा आणि अघोरी विद्येचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जत शहरातील निगडी रोडवरील प्रभाग क्रमांक 4, रेणुका नगर परिसरात रस्त्यालगत हिरव्या रंगाचे कापड, मडकी, दोन बाहुल्या, लिंबू आणि हळद-कुंकू असे अघोरी साहित्य पसरलेले आढळून आले. या साहित्यासोबतच निवडणूक रिंगणातील प्रमुख उमेदवारांच्या नावांच्या चिठ्ठ्या सापडल्याने परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणुकीला या अघोरी कृत्यांचे गालबोट लागल्याची चर्चा रंगली आहे.

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...

### मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन


नागपूर – जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या पंधरवड्याच्या निमित्ताने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नागपूर येथे मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या पुस्तक प्रदर्शनीचे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदयापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शालिनी लिहीतकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय लोकाभिमुख होऊन मराठी भाषेतील ग्रंथांचा उपयोग वाढविण्याकरीता नवनवीन उपक्रम राबविण्याविषयीची माहिती दिली. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या नागपूर येथील प्रतिथयश लेखिका प्रा. मनीषा साधू यांनी मराठी भाषेची ऐतिहासिक पाश्र्वभूमी, मराठी भाषेचा विकास व मराठी भाषेच्या सहाय्याने रोजगाराच्या संधी याबाबत माहिती दिली. ग्रंथालयातील ग्रंथ जितक्या जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचतील तितका मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होईल, तसेच ग्रंथोत्सवाऐवजी नियमित वाचन करणा-या रसिक वाचकांकरीता वाचकोत्सोव साजरा करण्यात यावा, अशीही त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तांत्रिक सहाय्यक माला राठोड यांनी केले. तर सूत्रसंचालन कोमल गेडाम यांनी केले. आभार सूर्यकांत भोसले यांनी मानले.

### तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक 14427

नागपूर- तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असुन, या घटकास समाजाकडुन सापत्न व भेदभावाची वागणुक दिली जाते. नेहमीच भेदभाव व सापत्न वागणुकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासुन दुर्लक्षित राहीलेला आहे. त्यामुळे या समाज घटकाचे शासनामार्फत मुलभुत अधिकाराचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे करिता तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व नियम २०२० संपुर्ण देशात लागु झालेला आहे. तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविणे करिता त्यांची ओळख निश्चित करणे करिता केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर हे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले आहे.तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींना आकस्मिक परिस्थितीत मदत मिळावी तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे या करिता नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर या पोर्टलवर नॅशनल हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन दिलेला आहे. तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींनी त्यांच्या तक्रारी व समस्यांच्या निराकरणासाठी तसेच आकस्मिक स्थितीत मदत मिळण्यासाठी तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

### निधन वार्ता



श्री पुरुषोत्तमराव रामचंद्रराव फुलारे यांच निधन: वय वर्षे - 64

नंदनवन नागपूर येथील रहिवासी श्री पुरुषोत्तमराव रामचंद्रराव फुलारे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 64 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे. अंत्यसंस्कार गंगाबाई घाटावर करण्यात आले.

# कार अपघातात एकाचा मृत्यू, चार जण गंभीर जखमी

## देवरी आमगाव मार्गावरील सोनारटोला येथे भीषण अपघात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**


आमगाव–देवरी मार्गावरील सोनारटोला येथे झालेल्या भीषण कार अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, कारमधील चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

ही दुर्घटना 21 व 22 जानेवारी 2026 च्या मध्यरात्री सुमारे 2 ते 3 वाजण्याच्या सुमारास घडली.

या अपघातात रिसामा येथील रहिवासी व पतंजली स्टोअर्सचे संचालक अशोक सत्यनारायण मोदी (वय 51 वर्षे) यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, अशोक मोदी आपल्या कुटुंबीयांसह 21 जानेवारी रोजी पुत्राच्या आगामी मार्च 2026 मध्ये होणाऱ्या विवाहासाठी खरेदी करण्यासाठी रायपूर (छत्तीसगड) येथे गेले होते.



रायपूरहून आमगावकडे



परतत असताना देवरी मार्गावरील सोनारटोला– डोंगरगाव दरम्यान असलेल्या पुलियाच्या पिलरला त्यांची



22 वर्षे) तसेच साळ्याची पत्नी दिपा नितीन अग्रवाल (वय 38 वर्षे) गंभीर जखमी झाले आहेत.


तपास सालेकसा पोलीस करत आहेत.

## अशी पाखरे येती निशिकांत मायी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर-आपल्या सभोवताल पर्यावरण आणि पक्षांबद्दल अतिशय आस्था असणारे आणि अजिबात ज्ञान नसणारे असे दोन समाज पहावयास मिळतात. अशी पाखरे येती हा ग्रंथ पक्षांविषयी रोचक माहिती देतानाच या दोन्ही समाजातील दरी कमी करणारा आहे. पक्षाच्या जीवसृष्टीतील स्थानाविषयी लोकजागृती करणारे हे पुस्तक पर्यावरणयोद्धे तयार करणारेही ठरणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पक्षी अभ्यासक अनिल पिंपळापुरे यांनी केले.

तरुण भारतमध्ये कार्यरत ज्येष्ठ पत्रकार निशिकांत मायी लिखित अशी पाखरे येती या पुस्तकाच्या प्रमुख अतिथी म्हणून ते प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. तुटत चाललेला मानव आणि पक्षांचा सहसंबंध




अधिक धृढ करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. 101 पक्षांचे जग अभ्यासू व रोचक पद्धतीने उगलडणारे हे पुस्तक श्री नरकेसरी प्रकाशनद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे. रामदासपेठेतील संस्कृती सेलिब्रेशनमध्ये आयोजित या प्रकाशन सोहळ्याला अध्यक्षस्थानी इको बॅलन्स फाऊंडेशनचे संचालक नितीन मराठे होते. ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. चारूदत्त मायी आणि लेखक निशिकांत मायी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. चारुदत्त मायी यांनी मनोगतात पक्षांचे पर्यावरण आणि शेतीसाठीचे महत्व कळण्यासाठी हा ग्रंथ महत्वाचा ठरणार असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात नितीन मराठे म्हणाले पक्षांबाबत अनेक भ्रामक कल्पना समाजात आहे. वनविभागाकडेही जंगलातील पक्षांची संपूर्ण माहिती नसल्याचे वास्तव आहे. आम्ही स्वतः पक्षांची यादी तयार करून वनविभाला दल्याचे ते यावेळी म्हणाले. शहरीकरणामुळे पक्षांच्या जीवनावर होत असलेला परिणाम लक्षात घेत यावर उपाय शोधण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. प्रास्ताविकपर मनोगतातून निशिकांत मायी यांनी पुस्तकाचा हेतू स्पष्ट केला. सं चालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. याप्रसंगी तरुण भारतचे प्रबंध संचालक धनंजय बापट, मुख्य संपादक शैलेश पांडे, नागपूर विभागाचे माहिती आयुक्त गजाजन निमदेव, ज्येष्ठ पत्रकार कमलाकर धारप यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. मायी परिवाराच्या वतीने मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## खासदार भजन स्पर्धेची प्राथमिक फेरी 6 फेब्रुवारीपासून

### प्रवेश अर्ज आजपासून उपलब्ध, 30 जानेवारीपर्यंत मुदत, केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांची संकल्पना

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर- केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आयोजित खासदार भजन स्पर्धेची प्राथमिक फेरी ६ ते १२ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष यंदाच्या स्पर्धेची मध्यवर्ती संकल्पना असणार आहे. या स्पर्धेसाठी उद्या, शुक्रवार, दि. २३ जानेवारीपासून प्रवेश अर्ज उपलब्ध होणार असून अर्ज सादर करण्यासाठी ३० जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागपूरातील सहा विधानसभा क्षेत्रात या स्पर्धेची प्राथमिक फेरी आयोजित करण्यात आली आहे. मध्य नागपूरची प्राथमिक फेरी ६ फेब्रुवारीला शिक्षक सहकारी बँक सभागृहात, दक्षिण नागपूरची प्राथमिक फेरी ७ फेब्रुवारीला श्री साई मंदिर, अयोध्या नगर येथे, पूर्व व उत्तर नागपूरची प्राथमिक फेरी ९ फेब्रुवारीला श्री हरिहर मंदिर लकडगंज येथे, पश्चिम नागपूरची प्राथमिक फेरी ११ फेब्रुवारीला श्रीराम मंदिर रामनगर, तर दक्षिण पश्चिम नागपूरची प्राथमिक फेरी १२ फेब्रुवारीला छत्रपती सभागृह, वर्धा रोड येथे सकाळी ९ ते ६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धकांना २ गीते ८ मिनिटांच्या आत सादर करायची आहेत. पहिले गीत हे संत ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग किंवा भक्तीगीत आणि दुसरे विठ्ठलाचा १ अभंग किंवा भक्तिगीत असावे. ही भजन स्पर्धा युवा व ज्येष्ठ अश्या दोन वयोगटात होणार असून युवा वयोगटात ७ तर ज्येष्ठ (३५ ते ७०) वयोगटातून १२ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. खासदार भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट्ट सभागृहात होणार आहे. यामध्ये २१ भजनी मंडळांना केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या भजन स्पर्धेच्या नोंदणीसाठी मा. नितीनजी गडकरी यांच्या खामला चौकातील (देवनगर) जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत संपर्क साधावा, असे आव्हाहन खासदार भजन स्पर्धेचे संयोजक डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी केले आहे.

## धनोजी कुणबी समाज विकास महासंघाच्या तर्फे विदर्भस्तरीय समाज व उपवर युवक -युवती परिचय मेळाव्याचे आयोजन शनिवारी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नागपूर : धनोजे कुणबी समाज विकास महासंघाच्या वतीने अनेक सामाजीक उपक्रम गेल्या १२ वर्षापासून राबवित आहे. त्यापैकी महत्वाचा उपक्रम म्हणजे विदर्भस्तरीय समाज व उपवर युवक-युवती परीचय मेळाव्याचे आयोजन शानिवारी २४ जानेवारीला सकाळी ११ वाजता. संताजी सांस्कृतीक सभागृह, बुधवार बाजार, पाण्याच्या टाकीजवळ नागपूर येथे आयोजीत केलेला आहेत. महासंघाने विदर्भातील सर्व समाज मंडळात समन्वय साधण्याचे काम सुरू असून विदर्भात धनोजे कुणबी समाज महत्वाचे योगदान देत आहे.




समाजातील विवाहाच्या समस्या दुर झाल्या आहेत. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील धनोजे कुणबी समाज जुळण्यास मदत झाली आहे याप्रसंगी स्नेहबंध नावाची रंगीत स्मरणिका प्रकाशीत करण्यात येणार असून त्यामध्ये उपवर युवक- युवती यांचे फोटो बायोडाटा संह प्रसिध्द करण्यात येईल. यावर्षी २१० उपवर युवक-युवतीची नावे स्मरणिकेत असतील. त्यामुळे समाजातील विवाहाची समस्या या उपक्रमामुळे दूर झाली आहे. या मेळाव्यात जास्तीत जास्त मोठ्या संख्येने समाजबांधवांनी हजर रहावे. यावर्षीही सुध्दा विदर्भातील सर्व समाजबांधवांनी मेळाव्यात हजेरी लावावी. असे आवाहन महासंघाने केले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे करणार असून या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मोहन मते, आमदार सुधाकर अडबाले, व अशोकराव जिवतोडे, अध्यक्ष श्री लिला बहुद्देशिय संस्था चंद्रपूर तसेच अनील गोवारदिपे, अधिवक्ता-नागपूर हायकोर्ट व सौ.रश्मी भुषण बेलेकर सदस्य बुटीबोरी नगर पंचायत हजर राहणार आहेत असे मधुकर श्यामराव ढोके अध्यक्ष- धनोजे कुणबी समाज विकास महासंघा तर्फे सांगितले. यावेळी दिनकर जिवतोडे, नारायणजी कुथे, सुरेशराव कुथे, देवरावजी टोंगे, नामदेवराव मोरे, नरेश बेरड, मारोतराव वांढरे दामोदर जोगी, रमेश ढोके, मोरेश्वर डहाके यांची उपस्थिती होती.




### चार दिवसीय नागमणी 2026 नाण्यांचे प्रदर्शन आजपासून

न्यूमिसमॅटिक रिसर्च इन्स्टिट्यूट नागपूर के तत्वज्ञान मे तीन दिवसीय नागमणी 2026 ऑल इंडिया कॉम्पिटिटिव्ह एक्जीबिशन पुराने और नये रुपयों और सिक्कों की प्रदर्शनी का आयोजन शुक्रवार से प्रारंभ !

## संघर्षशील व्यक्तिमत्व क्रांतीजोती सावित्रीबाई फुले- दिलीप येवले

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नागपूर :-स्थानिक मोहपा दिनांक 22/01/2026 रोजी क्रांतीजोती सावित्रीबाई फुले. यांच्या 3 जानेवारी, जयंतीच्या निमित्ताने बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय मोहपा, येथे महात्मा फुले आणि क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. निबंध स्पर्धेचा पुरस्कार वितरणाचा सोहळा दि. 22 जानेवारी गुरुवारला सामाजिक कार्यकर्ते दिलीप येवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षशील जीवन प्रवासावर आपल्या ओझळत्या वाणीतून विद्यार्थ्यासमोर उभा केला आणि शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. हा आत्मविश्वास दिलीप येवले यांनी प्रमुख वक्ता म्हणून विद्यार्थीशी संवाद साधला.



या स्पर्धेमध्ये 21 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रथम पुरस्काराचा मानकरी बी.ए भाग 1 चा विद्यार्थी, आदित्य पेंदाम तर द्वितीय पुरस्काराची मानकरी एम .ए समाजशास्त्र, द्वितीय विषयाची विद्यार्थिनी कु

अर्चना नेहारे, यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात आले. व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि एक पेन देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अलका थोडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. धनंजय देवते, डॉ

संजय ठवळे, प्रा. सचिन काळे, प्रा, शैलेश हातबुडे, प्रा. शुभम वाघ, श्रीमती कल्पना देवळे, हरीश अंजनकर, रजनी अकर्ते, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव सूत्रसंचालन डॉ. लिलाधर खरपुरीये आभार प्रा. अनिता गणोरकर यांनी मानले.

# माई ग्रुप चे डॉ.मोतीलाल चौधरीना महाराष्ट्र आइकॉन पुरस्कार जाहिर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नागपुर : माय ॲसेट्स इन्फ्रा (माई ग्रुप) चे सीएमडी डॉ मोतीलाल चौधरी नागपूरच्या रिअल इस्टेट उद्योगातील सर्वात आदरणीय आणि विश्वासार्ह नावापैकी एक मानले जातात. २५ वर्षांहून अधिक काळ मार्केटिंगचा व्यापक अनुभव आणि रिअल इस्टेटमध्ये २१ वर्षांच्या सातत्यपूर्ण यशासह, त्यांनी या क्षेत्रातील मालमत्ता बाजारपेठेत एक मजबूत, विश्वासार्ह आणि लोककेंद्रित उपस्थिती स्थापित केली आहे. धोरणात्मक दृष्टिकोन आणि नैतिक व्यवसाय पद्धती यांचे मिश्रण करण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे माई ग्रुप गुंतवणूकदार, घर खरेदीदार आणि उद्योगातील भागधारकां मध्ये एक विश्वासार्ह ब्रँड म्हणून उदयास आला आहे.

पुरस्कार आणि राष्ट्रीय मान्यता :

डॉ. चौधरी यांच्या नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकीमुळे त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक प्रतिष्ठित सन्मान मिळाले आहेत. १२ मार्च २०२३ मध्ये, सामाजिक सेवेतील त्यांच्या उत्कृष्ट योगदाना बद्दल त्यांना अमेरिकन ईस्ट कोस्ट विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. त्याच वर्षी 3 सप्टेम्बर 2023 ला त्यांना महाराष्ट्र उद्योग पुरस्कार देखील मिळाला २४ सप्टेम्बर २०२४ मध्ये नवी दिल्लीतील ग्लोबल एक्सलन्स फोरमने त्यांना इंडियन आयकॉन पुरस्काराने सन्मानित केले तेव्हा त्यांच्या कामगिरीला राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळत राहिली. तसेच २४ सप्टेम्बर २०२५ मध्ये, ग्लोबल एक्सलन्स फोरमने त्यांना भारत सन्मानाने सन्मानित केले. या ओळखीमध्ये भर घालत, २०२५ मधेच RED FM आणि BIG FM ने त्यांना बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड प्रदान केला, तर NAREDCO विदर्भाने २०२५ मध्ये माई ग्रुप ला नागपूरचा प्राइड ऑफ़ रिअल इस्टेट ब्रँड म्हणून सन्मानित केले. माय एसेट्स इन्फ्रा (माई ग्रुप) चा उदय डॉ.चौधरी यांच्या गतिमान नेतृत्वाखाली, माय असेट्स इन्फ्रा (माई ग्रुप) ची स्थापना ४ मार्च २०१६ रोजी झाली. तुलनेने कमी कालावधीत, ग्रुपने नागपूरमधील प्रमुख ठिकाणी ३२ रिअल इस्टेट प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत, ज्यात वर्धा रोड, हुडकेश्वर रोड, हिंगणा रोड आणि अमरावती रोड यांचा समावेश आहे या समूहाच्या पोर्टफोलिओ मध्ये प्रीमियम निवासी भूखंड, फ्लॅट आणि फार्महाऊसचा समावेश आहे , जे गुणवत्ता आणि पारदर्शकतेचे उच्च मानक राखून ग्राहकांच्या विविध आकांक्षा पूर्ण करतात.

ग्राहक-केंद्रित तत्वज्ञान:

डॉ.चौधरी यांच्या मते, यशाचे खरे माप केवळ बांधलेल्या इमारतींमध्ये नाही तर ग्राहकांचा विश्वास, समाधान आणि आणि आपली प्रमाणिकता यामध्ये आहे हा विश्वास माई ग्रुपचा मुख्य तत्वज्ञान आहे परिणामी, संस्थेशी संबंधित प्रत्येकजण -मग ते गुंतवणूकदार असोत, ग्राहक असोत किंवा विक्री व्यावसायिक असोत - प्रगती आणि सामायिक वाढीमध्ये भागीदार बनतो. दीर्घकालीन संबंध निर्माण करण्यात आणि शाश्वत यश मिळविण्यात या ग्राहक-प्रथम दृष्टिकोनाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सामाजिक जबाबदारीची वचनबद्धता :

व्यावसायिक कामगिरीच्या पलीकडे, डॉ. मोतीलाल जियालाल चौधरी सामाजिक उन्नतीसाठी खूप वचनबद्ध आहेत. त्यांच्या एनजीओ, माई फाउंडेशन च्या माध्यमातून, ते विविध सामाजिक उपक्रमांचे सक्रियपणे नेतृत्व करतात आणि त्यांना पाठिंबा देतात. यामध्ये वार्षिक आरोग्य तपासणी शिबिरे, नेत्र तपासणी, चष्म्याचे मोफत वाटप, दंत तपासणी, रक्तदान मोहीम आणि वृक्षारोपण कार्यक्रम यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे, ते सामाजिक विकास आणि पर्यावरणीय शाश्वततेमध्ये अर्थपूर्ण योगदान देत आहे.

दूरदृष्टी आणि करुणा असलेला व्यक्ति :

डॉ.चौधरी हे केवळ एक यशस्वी रिअल इस्टेट उद्योजक म्हणूनच नव्हे तर एक दयाळू माणूस आणि समर्पित सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही ओळखले जातात . त्यांचा प्रवास नैतिक नेतृत्व, दीर्घकालीन दृष्टीकोन आणि सामाजिक जबाबदारी कशी एकत्र राहू शकते आणि कशी भरभराट होऊ शकते हे प्रतिबिंबित करतो. ह्या इंग्रजी नववर्षाच्या शुभप्रसंगी, डॉ.मोतीलाल जियालाल चौधरी यांनी सर्वांना आनंद, शांती आणि समृद्धीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत, समावेशक विकास आणि सामाजिक कल्याणासाठी त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली आहे.

महाराष्ट्राच्या प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी निवड :

त्यांच्या समर्पणाची आणि कामगिरीची दखल घेत, त्यांना प्रतिष्ठित "महाराष्ट्र बिझनेस आयकॉन २०२५ पुरस्कारांसाठी निवडण्यात आले आहे. हा सन्मान Reseal.in आणि इंडिया फॅशन आयकॉन मॅगझिन द्वारे प्रदान केला जात आहे, जो महाराष्ट्रातील उदयोन्मुख उद्योजक




आणि कलाकारांचा गौरव करतो. ही निवड केवळ त्याच्यासाठीच नाही तर संपूर्ण प्रदेशासाठी अभिमानाचा क्षण आहे. प्रसिद्ध चित्रपट व्यक्तिमत्त्वांची उपस्थिती या भव्य पुरस्कार सोहळ्याला प्रसिद्ध चित्रपट कलाकार उपस्थित राहतील:

कु.वर्षा उसगावकर (बॉलिवूड अभिनेत्री) सुश्री सोनाली कुलकर्णी (भारतीय अभिनेत्री) कु.प्रार्थना बेहेरे (भारतीय अभिनेत्री) डॉ.चौधरी यांनी आपल्या आई वडील, परिवार, माई ग्रुप तसेच सर्व मित्रपरिवार याना ह्या पुरश्काराचे श्रेय दिले आहे.

## महत्त्वाचे...

### आर्णी तालुक्यात हभप शिवलीला पाटील यांचा जनजागृतीपर कार्यक्रम



आर्णी - राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा जनजागृती करण्यासाठी आर्णी तालुक्यात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत ह.भ.प. शिवलीला पाटील यांच्या प्रभावी कीर्तनातून पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या कार्यक्षमतेत वाढ करून प्रशासनाला गतिमान करणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. लोकसहभाग वाढवून ग्रामपंचायतींना सक्षम बनवण्यावर या उपक्रमात भर देण्यात आला आहे. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय, पाणीपुरवठा व स्वच्छता या क्षेत्रांत लोकाभिमुख सेवा देण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे. स्पर्धात्मक वातावरणातून ग्रामपंचायतींना नवी ऊर्जा मिळावी. या अभियानांतर्गत दि. २४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता आर्णी तालुक्यातील माजे जवळील श्री. गुरुदेव विद्या मंदिर कनिष्ठ व उच्च माध्यमिक विद्यालय परिसरात विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमात हभप शिवलीला पाटील यांच्या कीर्तनातून अभियानाचे उद्दिष्ट, लाभ आणि पंचायत राज व्यवस्थेची भूमिका प्रभावीपणे मांडली जाणार आहे. सर्व नागरिकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने केले आहे.



### अंकित सोनी यांचे आकस्मिक निधन; आमगावमध्ये शोककळा

आमगाव :- होमिओपॅथिक वैद्य व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग सहकार्यवाह डॉ. रमेश मनमोहन सोनी यांचे सुपुत्र चि. अंकित रमेश सोनी यांचे आज गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता आकस्मिक निधन झाले. दिवंगत अंकित सोनी यांची अंत्ययात्रा शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता त्यांच्या खासगी निवासस्थानातून (काली मंदिरासमोर, आमगाव) निघणार आहे. त्यांच्यावर साकरीटोला घाट (सालेकसा रोड) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अंकित सोनी यांच्या अकाली जाण्याने सोनी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण आमगाव परिसरात शोककळा पसरली आहे. नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# अकोल्यात भाजपला रोखण्यासाठी रणनीती!

## प्रकाश आंबेडकरांच्या निवासस्थानी विरोधकांची खलबतं; आम्हाला पद नको, पण भाजप नको- काँग्रेस

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

अकोला महानगरपालिकेत 38 जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी आवश्यक असलेला 41 चा आकडा गाठण्यापूर्वीच त्यांना रोखण्यासाठी शहरात 'हाय व्होल्टेज' राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी एमआयएम, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या नेत्यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. यामुळे अकोल्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून सत्तास्थापनेसाठी आता सर्वच विरोधक एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या रणनीतीचा भाग म्हणून काँग्रेसचे आमदार साजिद खान आणि प्रकाश आंबेडकर यांच्यात बंद दाराआड महत्त्वाची बैठक पार पडली, ज्यामध्ये एमआयएम आणि दोन्ही राष्ट्रवादीचे नेतेही सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, 21 नगरसेवक असलेल्या काँग्रेसने भाजपला रोखण्यासाठी मोठी तडजोड करण्याची तयारी दर्शवली आहे. आम्हाला सत्तेत कोणतेही पद नको, मात्र भाजपेतर सत्ता स्थापन व्हावी, असा स्पष्ट प्रस्ताव काँग्रेसने ठाकरे गटासमोर आणि इतर मित्रपक्षांसमोर ठेवला आहे. विरोधकांच्या या संभाव्य मोर्चेबांधणीमुळे अकोल्यात भाजपची सत्तास्थापनेची वाट बिकट होण्याची चिन्हे दिसत आहेत.

अकोला महानगरपालिकेत सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी सध्या राजकीय पेच निर्माण झाला असून 'वंचित' आणि ठाकरे गट आता 'किंगमेकर'च्या भूमिकेत आले आहेत. 80 सदस्यीय महापालिकेत बहुमत गाठण्यासाठी 41 जागांची आवश्यकता असताना, 38 जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, त्यांना बहुमतापासून रोखण्यासाठी काँग्रेसने कंबर कसली असून आमदार साजिद खान पठाण यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या उभय नेत्यांमध्ये तब्बल 45 मिनिटे बंद दाराआड चर्चा झाली, ज्यामध्ये 5 नगरसेवक असलेल्या वंचितचा पाठिंबा मिळवण्यासाठी काँग्रेसने आग्रही विनंती केली आहे.

दुसरीकडे, भाजपने सत्ता स्थापनेसाठी 6 नगरसेवक असलेल्या ठाकरे गटाला आधीच 'ऑफर' दिली होती, ज्याला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसनेही ठाकरे गटासमोर मोठा प्रस्ताव ठेवला आहे. 21 जागा असलेली काँग्रेस आता प्रकाश आंबेडकरांच्या साथीने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. अकोल्यात कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने, आता वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना



ठाकरे गट नेमकी कोणाची पाठराखण करणार, यावर अकोला महापालिकेच्या सत्तेचे भवितव्य अवलंबून आहे.

## मौदी पुनर्वसन येथे हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मौदी पुनर्वसन : — दिनांक 22 जानेवारी 2026 रोजी मौदी पुनर्वसन ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित हळदीकुंकू कार्यक्रम अत्यंत उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ. जयश्री विनोद वंजारी, माजी सरपंच, मौदी यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन ग्रामसेवक बोरकर साहेब यांनी केले. यावेळी सौ. मीनाक्षी लांडगे, कृषी सहाय्यक अधिकारी, भंडारा तसेच गावातील महिला मंडळातील सर्व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, गीत गायन स्पर्धा अशा विविध मनोरंजनात्मक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सहभागी महिलांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. मौदी ग्रामपंचायतीच्या भव्य पटांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला महिला भगिनींची





लक्षणीय उपस्थिती लाभली. हळदीकुंकू कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांमध्ये सामाजिक एकोपा, आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी महिला मंडळ व ग्रामपंचायतीचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे महिलांना व्यासपीठ मिळून सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## अमरावतीत रंगणार तिसरे मराठी गझल संमेलन

### 7, 8 फेब्रुवारीला आयोजन, वैभव जोशी यांची 'सोबतीचा करार' ही मैफल राहणार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

अमरावती- महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक गजलकारांच्या उपस्थितीत आगामी ७ व ८ फेब्रुवारीला अमरावतीत अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन येथील श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहात होईल. संमेलनाचे यजमानपद सुरेश भट प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर प्रतिष्ठानने स्वीकारले आहे.

सदर संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध गजलकार सीए नाना लोडम यांची निवड करण्यात आली आहे. या आयोजनाबाबत लोडम यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, प्रसिद्ध कवी व गजलकार वैभव जोशी हे या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष




असून उद्घाटन डॉ. राम पंडित (मुंबई) यांच्या हस्ते केले जाईल. यावेळी शाहीर सुरेशकुमार वैराळकर पुणे, दगडू दादा लोमटे अंबाजोगाई, संतोष बोरगावकर, डॉ. गणेश गायकवाड, शिवाजी जवरे, निवृत्त माहिती महासंचालक डॉ दिलीप पांढरपट्टे इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या संमेलनात एकूण १३ मराठी गझल मुशायरे रंगणार असून एक तरन्नूम मुशायरा आणि परिसंवाद व गजल गायन मैफिल राहणार आहे. याशिवाय वैभव जोशी यांची 'सोबतीचा करार' ही मैफलसुद्धा राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन हे अमरावती जिल्ह्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या संमेलनासाठी एक आयोजन समिती गठित करण्यात आली असून त्यामध्ये स्वागताध्यक्ष नाना लोडम, प्रसिद्ध वऱ्हाडी कवी नितीन देशमुख, अनंत नांदुरकर-खलीश, नवोदित गजलकार नितीन भट, कवी संजय इंगळे तिगावकर यांच्यासह सहसमन्वयक संदीप देशमुख, मारुती मानमोडे, निलेश कवडे, अजिज खान पठाण, रेणुका पुरोहित यांचा समावेश आहे.

रसिकांना भरगच्च मेजवानी मिळणार अमरावती शहर ही विदर्भाची सांस्कृतिक राजधानी असून कविवर्य सुरेश भट यांची गृहनगरी आहे.

अशा शहरात मराठी गजलेची भरगच्च मेजवानी रसिकांना मिळणार आहे. शंभर वर्षांपूर्वी विदर्भ साहित्य संघाची स्थापना याच शहरात झाली होती. त्यामुळे येत्या काळात शंभरावे अ. भा. मराठी साहित्य संमेलन येथे घेण्यासाठीही काही मराठी सारस्वत तयारीला लागले आहेत. प्रसिद्ध मराठी गजलकार भीमराव पांचाळे हेही याच जिल्ह्याचे रहिवासी आहेत.

## अनोखा हळदीकुंकू तिळगुळ समारंभ



अखिल भारतीय सावित्री ब्रिगेड नागपूर आणि थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस नागपूर द्वारे अनोखा हळदीकुंकू आणि तिळगुळ समारंभ विरंगुळा केंद्र, हनुमान मंदिर, दुर्गा नगर नागपूर येथे घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. स्मिता मेहेत्रे, उद् घाटक डॉ.अर्चना रतकंठीवर,प्रमुख पाहुणे ॲड. रश्मी खापर्डे, प्रा.देवल अढाऊ होत्या.



## लता मंगेशकर हॉस्पिटलतर्फे फिरता दवाखाना आरोग्यासंबंधी जनजागृतीसाठी स्तुत्य उपक्रम

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

आरोग्य चांगले राहण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताण व्यवस्थापन तसेच मद्यपान व धूम्रपान टाळणे आवश्यक आहे. सोबतच नियमित आरोग्य तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून शरीर आणि मन निरोगी राहील आणि दीर्घायुष्य जगण्याचा मार्ग मोकळा होईल. आरोग्य जनजागृतीच्या माध्यमातून समाजाला स्वस्थ जीवन जगण्यासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूरच्या वतीने शासनाच्या आरोग्य सेवा आपल्या दारीच्या धर्तीवर 'फिरता दवाखाना' सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत आरोग्य तपासणी सुविधांनी सुसज्जित वाहन आणि विशेषज्ञांद्वारे शहरी व विविध गावांमधील आठवडी बाजारात नागरिकांना निःशुल्क प्राथमिक आरोग्यसेवा, तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. या फिरत्या दवाखान्यात रक्तदाब, मधुमेह, ताप, सर्दी-खोकला व इतर सामान्य आजारांची तपासणी, तसेच मोफत वैद्यकीय सल्ला व आवश्यक औषधांचे वितरण करण्यात येणार आहे. यासोबतच नागरिकांना शासकीय आरोग्य योजना, मोफत उपचार सुविधा, महिला व बाल आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य तसेच जीवनशैलीविषयक आजारांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

## अचलपूर पालिकेत भाजप-MIM चा घरोब्याची चर्चा:आमची युती नाही..

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर नगरपालिकेत भाजप आणि एमआयएम यांच्यात युती झाल्याच्या चर्चांमुळे राजकीय वातावरण तापले असतानाच भाजपकडून या चर्चांचे खंडन करण्यात आले आहे. भाजपचे नेते अभय माथने यांनी स्पष्ट शब्दांत भाजप–एमआयएम युती नसल्याचे सांगत, चुकीची माहिती पसरवली जात असल्याचा आरोप केला आहे.अचलपूर नगरपालिकेतील शिक्षण व क्रीडा समितीच्या सभापती पदावर एमआयएमच्या नगरसेवकाची निवड झाल्यानंतर भाजप आणि एमआयएम एकत्र आल्याच्या चर्चा सुरू झाल्या. मात्र, या संदर्भात अभय माथने म्हणाले की, "अचलपूरमध्ये भाजपची उमेदवार निवड चुकली. त्यामुळे आमचे अपेक्षेप्रमाणे नगरसेवक निवडून आले नाहीत. एमआयएमच्या उमेदवाराची सभापती म्हणून निवड झाली असली तरी आमची आणि त्यांची कोणतीही युती झालेली नाही. भाजप–एमआयएम युती असल्याची माहिती पूर्णपणे चुकीची आहे."


## निवडणूक कामात स्वच्छतेचा बोजवारा; घंटागाड्या 15 दिवसांपासून धूळखात

### स्वच्छतेचे नवीन कंत्राट सुरु झाल्यानंतरही सर्वत्र कचरा पडून, कंत्राटदाराचे दुर्लक्ष

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

यवतमाळ : शहरातील स्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अनेक प्रभागांमध्ये मागील १५ दिवसांपासून निवडणुकीच्या धामधुमीत घंटागाड्याच फिरकल्या नसल्याने नागरिकांच्या घरात कचरा साठला आहे. एवढेच नव्हे तर मोकळ्या जागा आणि कंटेनरच्या जवळही कचऱ्याचे ढिग दिसत आहेत. मनपा प्रशासन, नियमित स्वच्छता अधिकारी, कर्मचारी महानगर पालिका निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिल्याने त्यांचे शहराच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले. परिणामी शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे.

एकिकडे शहराच्या स्वच्छतेसंदर्भातील तक्रारी सोडवण्यासाठी मनपा स्वच्छता विभागाने ०७२१२६७२३००, ७५१७५१६१६२ हे दोन हेल्पलाईन क्रमांक एक मो.क्र.७०३००९२६४८ कोणकोणत्या प्रभागात घंटागाडी निवडणुकीच्या काळात फिरकली नाही, याबाबत तत्काळ सॅनिटरी इन्सपेक्टरला (एसआय) माहिती घेण्यास सांगणार आहे. तसेच स्वच्छता कंत्राटदारालाही याबाबत कळवून तत्काळ कारवाई करण्यास सांगितले जाईल. - डॉ. अजय जाधव, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी. हातावर पोट असलेले घंटागाडी चालक हे जेथे त्यांना जास्त कमाई होईल, तिकडे प्राधान्याने लक्ष देत असतात. हे साहजिकही आहे. कारण, दु.१२



पर्यंतच ते घंटागाडीवर काम करतात. तुटपुंज्या पगारात कसे भागणार म्हणून नंतर दुसरे काम करावे लागते. अशा बहुतेक घंटागाडी चालकांना यावेळी निवडणुकीच्या निमित्ताने कमाई करण्याची आयतीच संधी मिळाली. त्यामुळे काहींनी १५ दिवसांच्या सुट्या टाकल्या. ते प्रचार कार्यात व्यस्त झाले. अशात झोननिहाय कचरा कंत्राटदाराने त्यांच्या जागी अन्य घंटागाडीची व्यवस्था करणे अनिवार्य असतानाही केले नाही. महानगर पालिका प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिले. त्यामुळे शहरातील स्वच्छतेकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

एवढेच नव्हे तर स्वच्छता कंत्राटदारांनाही मनपाकडून नियमित देयक (बिल) मिळत नसल्याने तेही वैतागले आहेत. क्षितीज नागरिक बेरोजगार सहकारी संस्थेने झोन क्र. ३ दस्तूरनगरचे स्वच्छता कंत्राट सोडले आहे. इतर स्वच्छता कंत्राटदारही याच विचारात आहेत. मात्र, अद्याप त्यांनी कंत्राट सोडले नाही. दस्तूरनगर झोनमध्येही सर्वत्र कचरा साठला असून मनपाला येथील स्वच्छतेसाठी आणखी ३ ते ४ दिवस लागणार आहेत.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल पब्लीक स्कुलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर, दि. 22 अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबरोबरच त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातुन एकलव्य निवासी शाळेत प्रवेश दिला जातो. यावर्षी विभागातंर्गत १० एकलव्य मॉडेल निवासी शाळेत प्रवेश प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. एकलव्य परीक्षा १ मार्च २०२६ ला असल्याने या निवासी शाळेत इयत्ता ६ वी मध्ये नियमित प्रवेश घेण्यासाठी आणि इयत्ता ७ ते ९ वीच्या वर्गातील अनुसूचित जमातीच्या रिक्त जागांवर प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक अथवा मुख्याध्यापक यांनी नजीकच्या एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संपर्क करून ३० जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज प्राप्त करून घेण्यात यावे. शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा, जिल्हापरीषद, नगरपालीका, व महानगरपालीकेच्या तसेच इतर शासनमान्य अथवा खाजगी अनुदानित शाळेत शिकत असणारे कोणताही अनुसूचित जमातीचा विद्यार्थी हे आवेदनपत्र भरू शकेल. तसेच इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी अनुसूचित जमातीच्या दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के आणि आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेत ५ जागा आरक्षित असणार आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार आणि पालकांच्या मुळ रहिवासाचे ठिकाण तसेच पत्ता विचारात घेऊन नजीकच्या एकलव्य मॉडेल निवासी शाळेत उपलब्ध जागेनुसार प्रवेश देण्यात येईल. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित प्रकल्प कार्यालये यांच्याशी संपर्क साधावा , असे आवाहन अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग आयुषी सिंह यांनी केले आहे.

## मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज २३ जानेवारी, हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची १०० वि जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

# स्वीकृत नगरसेवक पद राजकीय पातळीवर देण्यापेक्षा;सामाजिक पातळीवर दिले तर राज्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल

राज्यात व जिल्ह्यात महानगरपालिका निवडणुका झाल्यात आणि त्यातुनच "नगरची" सेवा करण्यासाठी "नगरसेवकांची" नियुक्ती झाली आहे. या नगरसेवकांना जनतेचा कौल मिळाला त्यामुळे हे नगरसेवक जनप्रतिनिधींची भूमिका निभविणार आहेत.या व्यतीरीक्त प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५ नगरसेवकांमागे १ स्वीकृत नगरसेवक अशा पध्दतीचे त्या-त्या महानगरपालिकेमध्ये अंदाजे १० किंवा कमी-जास्त स्वीकृत नगरसेवकसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.कोणाला स्वीकृत नगरसेवक करायचे हा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना असतोच यात दुमत नाही.परंतु राजकीय पक्षांसोबत जर सामाजिक कार्यातील व्यक्ती जुळली तर विकास भरभराटीला येईल.शहराच्या विकासाला खरोखरच गती यावी असे जर सरकारला वाटत असेल तर मग सामाजिक कार्यातील पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून का घेऊ नये?जिथे विकास हे ध्येय आहे.तिथे त्याग हा असलाच पाहिजे व त्यागाची भावना राजकीय पक्षांनी ठेवली पाहिजे.याकरीता थोडे राजकारण बाजूला सारून सामाजिक कार्याला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे. त्याचप्रमाणे संपूर्ण राजकीय पक्ष आपापल्या पक्षांचे उमेदवार निवडून यावे यासाठी प्रयत्नशील असतात आणि असायलाच हवे.परंतु प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असने गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या व गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत व दिल्ली पासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लेखणीच्या माध्यमातून असो अथवा आपापल्या कार्यक्षेत्राच्या माध्यमातून असो अशांचा मानसन्मान कुठेतरी व्हायला हवा व त्यांच्या कार्याची पावती त्यांना कुठेतरी पुरस्कार रूपात मिळायला हवी म्हणून स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात त्यांना मानाचे स्थान मिळायला हवे असे मला वाटते. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे.परंतु सामाजिक कार्याला एक नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व प्रशासनाने पाऊल उचलले पाहिजे.कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गूरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देवून विकासाला वेग देण्यासाठी एक नवीन पाऊल उचलने गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून एक नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची व राजकीय पक्षांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबत सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकासामध्ये मोठी भर पडेल व मदत होईल. सरकारला माझी विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा. कारण अत्याधुनिक युगात शहर, राज्य, देश सध्याच्या परिस्थितीत विकासाचा महामेरू उभा करीत आहे यात स्वीकृत नगरसेवकसेवकांच्या माध्यमातून महानगरपालिकेमध्ये सामाजिक कार्याची भर पडली तर अवश्य त्याचे सोन होईल. कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल.कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा दांडगा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्ष व सरकारने एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# 'जेन झी'कडे भाजपचे नेतृत्व

बिहारमधील राजकीय घडामोडींची खडानखडा माहिती असणाऱ्या नितीन नबीन यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जगातील सर्वाधिक सदस्य असलेल्या भाजपला आता दक्षिणायन करून तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगाल पादाक्रांत करायचा आहे. अर्थात मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या छत्रछायेखाली कारभार चालणार असल्यामुळे त्यांना ताण घेण्याचे काहीच कारण नाही.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरोधात जेन झीने आवाज उठवण्याचे आवाहन केले होते. जगभर आता जेन झी क्रांतीची मशाल हाती घेत असताना भारतातही तसे व्हावे, अशी राहुल यांची इच्छा असली, तरी राहुल यांच्या पक्षाची धुरा अजूनही ज्येष्ठांच्या हातात आहे. निवडणूक जिंकून द्यायला युवक आणि पदे मात्र ज्येष्ठांना, यामुळे तर काँग्रेसला कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये फटका बसला. याउलट, सत्तेतील महत्त्वाची पदे भाजपची ज्येष्ठ मंडळी भूषवत असली, तरी संघटनात्मक तसेच अन्य पदांवर युवक आणि मध्यमवयीन नेत्यांची वर्णी लावून भाजपने संतुलन साधले. आता मोदी हेही जेन झीला आकर्षित करत आहेत. पश्चिम बंगालमधील त्यांचे भाषण ऐकल्यास त्यात त्यांनी युवकांच्या भावनांना हात घातलेला दिसतो. दिल्लीत मोदी यांच्याविषयी आयोजित पुस्तक प्रदर्शनामागेही जेन झीच्या भावनांचा उद्रेक न होता ते आपल्याबरोबर कसे राहतील, ही व्यूहनीती होती. आता त्याचे पुढचे पाऊल म्हणून जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाची धुरा ४५ वर्षांच्या नितीन नबीन यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेली बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदलाचे संकेत देते. नबीन यांना नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय केवळ एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय नाही, तर राष्ट्रीय राजकारणाला एक स्पष्ट संदेशदेखील देतो. भाजपमध्ये नेतृत्वाचा मार्ग वय किंवा वंशावळीने नव्हे, तर कठोर परिश्रम, ऊर्जा आणि संघटनात्मक क्षमतेने ठरवला जातो, हा या निवडीमागील संदेश आहे. केवळ ४५ वर्षांच्या नबीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवून पक्षाने सिद्ध केले आहे, की भाजप भविष्यातील राजकारणावर लक्ष ठेवून तरुण नेतृत्व जोपासते. दुसरीकडे, काँग्रेसचे नेतृत्व ८३ वर्षीय मल्लिकार्जुन खरगे यांच्या खांद्यावर आहे. नबीन यांची नियुक्ती ही केवळ एक नियुक्ती नाही, तर पक्षामध्ये पिढ्यानपिढ्या होणाऱ्या बदलांचे प्रतीक आहे. १९८० मध्ये स्थापनेपासून, पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि कुशाभाऊ ठाकरे यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपला वैचारिक आणि संघटनात्मक पाया मजबूत केला. त्यांच्यापाठोपाठ, नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, व्यंकय्या नायडू, अरुण जेटली, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा आणि अमित शहा यांच्यासह दुसऱ्या पिढीने, तर धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, प्रल्हाद जोशी आणि अनुराग ठाकूर यांच्यासह तिसऱ्या पिढीने पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विस्तार केला आणि पक्षाला सत्तेत आणले. आता चौथी पिढी म्हणून भाजपने नबीन यांची निवड केली आहे. नबीन हे भाजपचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यापूर्वी अमित शहा यांनी ४९व्या वर्षी पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्यापूर्वी नितीन गडकरी ५२व्या वर्षी अध्यक्ष झाले होते.

ताज्या निवडीने भाजपने तरुणांना थेट संदेश दिला आहे, की वय हा पक्षात अडथळा नाही. नबीन हे कायस्थ समुदायातून येतात. त्यांची संख्या निवडणुकीच्या राजकारणात निर्णायक मानली जात नाही. असे असूनही, त्यांना पक्षाच्या सर्वोच्च पदावर नियुक्त केल्याने दिसून येते, की भाजप नेतृत्व निवडीमध्ये जातीच्या अंकगणितापेक्षा संघटनात्मक क्षमता आणि राजकीय समजुतीला प्राधान्य देत आहे. संघटनेत काम करणारा, जमिनीशी जोडणारा आणि निवडणूक आव्हाने समजून घेणारा कार्यकर्ता वरच्या स्थानी पोहोचू शकतो. प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टिकोनातून नबीन यांची निवड महत्त्वाची आहे. ते बिहारचे आहेत आणि भाजपचे पूर्व भारतातून येणारे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यावरून स्पष्ट होते, की पक्षाचे लक्ष हिंदी पट्ट्यापुरते किंवा पश्चिम भारतापुरते मर्यादित नाही. भाजप बिहार, बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करू इच्छित आहे. नबीन यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ तीन वर्षांचा आहे, परंतु २०२९ च्या लोकसभा निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील हे निश्चित आहे. त्यांच्या आधी पक्षाने लोकसभा निवडणुका लक्षात घेऊन शहा आणि नंतर नड्डा यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवला होता. म्हणूनच त्यांची टीम तरुण आणि अनुभवी नेत्यांमध्ये संतुलन राखत असल्याचे म्हटले जाते. पक्ष संघटनेत महिलांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्वाची तरतूद असून नवीन टीममध्ये महिला आणि तरुण चेहऱ्यांना आघाडीवर आणण्याची योजना आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' सरकार बारा वर्षांपासून सत्तेत असताना नबीन यांनी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस बंगालमध्ये १५ वर्षांपासून सत्तेत आहे. बिहार आणि ओडिशानंतर, भाजपचे पूर्वेकडील सर्वात मोठे आव्हान म्हणजे बंगालमध्ये कमळ फुलवणे. तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. भाजप केरळमध्ये वीस टक्के मते मिळवत आहे; परंतु त्याचा उपयोग जागा जिंकण्यात होत नाही. तिरुवनंतपुरममध्ये भाजपने महापौरपदाची निवडणूक जिंकली आहे. पक्ष तिसरी शक्ती बनण्याचा प्रयत्न करत आहे. तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकाही लवकरच होणार आहेत. तिथे द्रमुक-काँग्रेस युती दहा वर्षांपासून सत्तेत आहे. अण्णाद्रमुक आणि इतर पक्षांशी युती करून पक्ष पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. पुद्दुचेरीमध्ये सत्ता टिकवून ठेवणेदेखील आव्हानात्मक आहे. देशातील ६५ टक्के लोकसंख्या सध्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. भाजप अध्यक्ष म्हणून नबीन यांच्यावर भाजपचा पाठिंबा राखण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. नबीन यांची नियुक्ती तळागाळातून सुरू झालेल्या आणि राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचलेल्या व्यापक अंतर्गत निवड प्रक्रियेचा परिणाम आहे. ही नियुक्ती भाजपच्या संघटनात्मक ताकदीचे आणि आगामी महत्त्वाच्या राज्यातील निवडणुकांपूर्वी बदलावर भर देण्याचे लक्षण म्हणून पाहिली जाते. त्यांनी बिहारमधील पक्षाच्या युवा संघटनेपासून सुरुवात केली आणि निवडणुकीच्या जबाबदाऱ्या स्वीकारत उच्च पदांवर पोहोचले. यातील एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे छत्तीसगड तसेच दिल्लीमध्ये भाजपला पुन्हा सत्तेत आणण्यामध्ये नबीन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**अजय तिवारी**, मुंबइ

# तांदूळनिर्यातीला वेसण



भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टॅरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात. इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे; परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्राएलचा शेतकरी सधन झाला. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते.

**मुकुंद गायकवाड,** पुणे

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### नगरसेवक दाम्पत्याच्या कारचा अपघात:दोघेही थोडक्यात बचावले

जळगावच्या माजी महापौर तथा भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका जयश्री महाजन व त्यांचे नगरसेवक पती सुनील महाजन यांच्या कारला मालेगाव लगत भीषण अपघात झाला आहे. त्यात हे दाम्पत्य थोडक्यात बचावले असून, एक मोठा अनर्थ टळला आहे. नाशिक येथून गट नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून जळगावला परताना ही घटना घडली आहे. जळगाव महापालिकेच्या निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक 46 नगरसेवक निवडून आले. या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या गट नोंदणीची प्रक्रिया पार पडण्यासाठी हे सर्व नगरसेवक नाशिक येथील विभागीय आयुक्त कार्यालयात गेले होते. यात जयश्री महाजन व त्यांचे पती सुनील महाजन यांचाही समावेश होता. गट नोंदणीची प्रक्रिया पार पाडून जळगावच्या दिशेने परत जाताना मुंबई - आग्रा महामार्गावर त्यांच्या कारला अपघात झालायासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबई - आग्रा महामार्गावरून जात असताना महाजन दाम्पत्याच्या कारच्या पुढे असणाऱ्या वाहनाने अचानक ब्रेक दापबला.

### परभणीत जिल्हा परिषदेत रंगणार कौटुंबिक महासंग्राम



मुंबई - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत घराणेशाहीचा मुद्दा नेहमीच चर्चेत असतो, मात्र परभणी जिल्हा परिषद निवडणुकीने या चर्चेला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्या कुटुंबातील तब्बल पाच सदस्य यंदा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. विशेष म्हणजे, हे पाचही जण वेगवेगळ्या राजकीय विचारधारेच्या पक्षांकडून एकमेकांविरुद्ध किंवा वेगवेगळ्या गटांतून नशीब आजमावत असल्याने परभणीच्या राजकारणात हा 'कौटुंबिक महासंग्राम' सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. काही महिन्यांपूर्वी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केलेल्या सुरेश वरपुडकर यांचा प्रभाव भाजपच्या उमेदवारी यादीत स्पष्टपणे दिसून येत आहे. वरपुडकर यांचे चिरंजीव समशेर वरपुडकर हे सिंगणापूर जिल्हा परिषद गटातून भाजपचे अधिकृत उमेदवार आहेत. त्यांच्या जोडीला वरपुडकर यांची सून प्रेरणा वरपुडकर या दैठणा गटातून मैदानात उतरल्या आहेत. तसेच, लोहगाव गटातून वरपुडकर यांचे पुतणे बोनी वरपुडकर यांनाही भाजपने संधी दिली आहे. अशा प्रकारे वरपुडकर घराण्यातील तीन सदस्यांनी 'कमळ' हाती घेतले आहे.या निवडणुकीत सर्वात मोठा ट्विस्ट तेव्हा आला, जेव्हा सुरेश वरपुडकर यांच्या कन्या सोनल देशमुख यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. आमदार राहुल पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी झरी जिल्हा परिषद मतदारसंघातून उबाठा शिवसेनेच्या उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे.

# वडिलांना तिकीट नाकरल्याने संतापजनक निषेध!

## आमदार संजय बनसोडेंच्या कार्यालयाबाहेर केली लघुशंका, तरुणाचे निंदनीय कृत्य

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई-महानगरपालिका निवडणुकीचा धुरळा खाली बसल्यानंतर, आता जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून, लातूरमध्ये उमेदवारी वाटपावरून सुरू असलेला वाद एका टोकाच्या आणि संतापजनक स्तरावर पोहोचला आहे. माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संजय बनसोडे यांच्या लातूर शहरातील जनसंपर्क कार्यालयाबाहेर एका तरुणाने लघवी करून आपला निषेध नोंदवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, या कृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी २१ जानेवारी २०२६ रोजी घडली. उदगीर तालुक्यातील निळेबन जिल्हा परिषद गटातील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते मधुकर एकुरकेकर हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी त्यांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली होती.

मात्र, पक्षाने त्यांना डावलून दुसऱ्या उमेदवाराला तिकीट दिल्याने एकुरकेकर कुटुंबीय आणि त्यांचे समर्थक प्रचंड नाराज झाले आहेत.

आपल्या वडिलांवर अन्याय झाल्याच्या भावनेतून मधुकर एकुरकेकर यांचा मुलगा नितीन एकुरकेकर याने संतापाच्या भरात हे कृत्य केले. त्याने थेट लातूर येथील आमदार संजय बनसोडे यांच्या कार्यालयाबाहेर जाऊन लघवी केली आणि आपला निषेध नोंदवला. विशेष म्हणजे, या कृत्याचा व्हिडिओ त्याने स्वतःच्या सोशल मीडिया हँडलवर शेअर केला होता. मात्र, प्रकरणाने गंभीर वळण घेतल्याचे लक्षात येताच काही वेळाने तो व्हिडिओ हटवण्यात आला.

मधुकर एकुरकेकर यांच्या समर्थकांनी पक्ष नेतृत्वावर गंभीर आरोप केले आहेत. "एकुरकेकर यांनी अनेक वर्षे स्थानिक पातळीवर प्रामाणिकपणे पक्षाचे काम केले. पक्ष अडचणीत असतानाही ते सोबत राहिले. मात्र, निवडणुकीच्या वेळी निष्ठेची दखल न घेता त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले," असा दावा समर्थकांनी केला आहे. याच अन्यायाच्या भावनेतून नितीनने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे.

लोकशाहीत निषेध नोंदवण्याचे अनेक मार्ग असताना, अशा प्रकारचे निंदनीय कृत्य करणे चुकीचे असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे. आमदारांच्या कार्यालयाबाहेर घडलेल्या



या प्रकारामुळे लातूरमधील राजकीय वातावरण अधिकच तापले असून, आता पक्ष यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुंबईचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल

## मंत्री आशिष शेलार यांचा ठाकरे बंधूंना टोला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी मुंबईत महायुतीचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल असे विधान करत ठाकरे बंधूंना टोला हाणला आहे. महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत ही नियमानुसार झाली आहे. आता नियमानुसार महायुतीचा महापौर मुंबई महानगरपालिकेत बसेल, असे ते म्हणाले.

मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांची गत 15 जानेवारी रोजी निवडणूक झाली. त्यानंतर आज या महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत झाली. त्यात मुंबईचे महापौरपद सर्वसारण महिला प्रवर्गाला सुटले आहे. या सोडतीवेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने गैरप्रकार झाल्याचा आरोप केला. पण सरकारने तो जोरकसपणे फेटाळून लावला. या पार्श्वभूमीवर आशिष शेलार यांनी ठाकरे बंधूंना टोला हाणत मुंबईचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल असा दावा केला.

महायुतीचा महापौर डौलाने बसेल

आशिष शेलार सोडतीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले, आरक्षणाची सोडत ही प्रक्रियेचा भाग असते. त्या प्रक्रियेनुसार



जी काही आरक्षण सोडत झाली, ती कायद्यानुसार, परंपरेनुसार व नियमानुसार झाली. आता नियमानुसार महायुतीचा महापौर मुंबईत बसेल. वाजगतगाजत बसेल. मुंबईकरांच्या आशीर्वादाने बसेल. मराठी माणसांच्या सेवेसाठी बसेल. संपूर्ण मुंबईच्या विकासासाठी बसेल. महायुतीचा महापौर डौलाने बसेल, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे ठाकरे बंधूंनी महापालिका निवडणुकीपूर्वी मराठी माणसांना हिंदीच्या सक्तीविरोधात आयोजित करण्यात आलेल्या सभेसाठी वाजतगाजत येण्याचे आवाहन केले होते. आशिष शेलार यांनी आता मुंबईचा महापौर वाजतगाजत बसेल असे विधान करत त्यांच्या या विधानाचा समाचार घेतला आहे.

काय म्हणाले होते ठाकरे बंधू?

ठाकरे बंधूंनी राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा धोरण राबवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात रान पेटवले होते. या दोन्ही बंधूंच्या एकजुटीमुळे सरकारने एक पाऊल मागे घेत हिंदी सक्तीचा जीआर रद्द केला. यावेळी आपल्या 5 जुलैच्या सभेला येण्याचे आवाहन करताना ठाकरे बंधू म्हणाले होते, आवाज मराठीचा! मराठी मातांनो, भगिनींनो आणि बांधवांनो, सरकारला नमवलं का? तर हो नमवलं...! कोणी नमवलं तर ते तुम्ही, मराठी जनांनी नमवलं! आम्ही फक्त तुमच्या वतीने संघर्ष करत होतो. त्यामुळे हा आनंद साजरा करतानासुद्धा, आम्ही फक्त या मेळाव्याचे आयोजक आहोत, बाकी जल्लोष तुम्ही करायचा आहे. वाजत गाजत या, जल्लोषात, गुलाल उधळत या !! आम्ही वाट बघतोय...! आपले नम्र, राज ठाकरे - उद्धव ठाकरे.

# स्पर्धा परीक्षांसाठी खराब रेटिंग असणारे परीक्षा केंद्र

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे महापालिका ज्युनियर अभियंता परीक्षा अचानक खासगी, कमी दर्जाच्या व खराब रेटिंग असणाऱ्या केंद्रांवर घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यावर काँग्रेससह सर्वच प्रमुख विरोधी पक्षांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी व गोंधळ निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.काँग्रेसने या प्रकरणी म्हटले आहे की, राज्यातील सर्व स्पर्धात्मक आणि भरती परीक्षा अनेक वर्षांपासून अधिकृत, सुरक्षित आणि विश्वासार्ह TCS iON केंद्रांवर सुरळीतपणे पार पडत आहेत. मात्र 25 जानेवारी 2026 रोजी होणारी पुणे महानगरपालिका ज्युनियर अभियंता परीक्षा अचानक खाजगी, कमी दर्जाच्या आणि खराब रेटिंग असलेल्या केंद्रांवर घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी आणि गोंधळ निर्माण झाला आहे.



उमेदवारांकडून आधीच भरमसाठ परीक्षा शुल्क आकारूनही, स्वतःच्या शहरापासून 300–400 किमी दूर खाजगी केंद्रावर परीक्षा द्यावी लागणे हे अत्यंत गैरसोयीचे व अन्यायकारक आहे. प्रवासाचा खर्च, राहण्याची सोय, वेळेची उधळपट्टी, धावपळ आणि मानसिक ताण या सर्वांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या तयारी व आत्मविश्वासावर होत आहे.

यापूर्वी अनेक भरती परीक्षांमध्ये खाजगी केंद्रांवर तांत्रिक बिघाड, गैरप्रकार, अव्यवस्था आणि व्यवस्थापनातील त्रुटी दिसून आल्याने विद्यार्थ्यांचा विश्वास आधीच कमी झाला आहे. अशा परिस्थितीत पुणे महानगरपालिका सारख्या महत्त्वाच्या भरती प्रक्रियेसाठी खाजगी, कमी दर्जाच्या केंद्रांचा वापर करणे हे पूर्णपणे अव्यवहार्य आणि विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहे.

आज राज्यभरातील हजारो उमेदवार अचानक जाहीर झालेल्या दूरच्या केंद्रांमुळे त्रस्त आहेत. खाजगी केंद्रांचा निर्णय तातडीने मागे घेऊन परीक्षा केंद्रांचे पुनर्नियोजन करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसानीसाठी पुणे महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील. या संपूर्ण लढ्यात NSUI विद्यार्थ्यांसोबत ठामपणे उभी आहे. अधिकृत TCS iON केंद्रांवरच परीक्षा घ्या. विश्वास, सुरक्षितता आणि पारदर्शकतेशी तडजोड मान्य नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, PMC कनिष्ठ अभियंता पदाच्या 169 जागांसाठी २५ जानेवारी रोजी होत असलेल्या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांनी TCS ION केंद्रांची मागणी करूनही त्यांना खाजगी परीक्षा केंद्र देण्यात आली आहेत.

# मुंबईची पुढची महिला महापौर कोण ?

## भाजपकडून कोणाच्या गळ्यात माळ ?

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर मुंबईच्या महापौरपदाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कारण मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात श्रीमंत आणि प्रभावशाली महापालिका मानली जाते. आज जाहीर झालेल्या सोडतीनुसार मुंबईचे महापौरपद हे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव करण्यात आले आहे. त्यामुळे आता मुंबईच्या पुढील महिला महापौर कोण असणार, यावर राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मुंबई महापालिकेत सध्या शिवसेना-भाजप-रिपब्लिकन पक्ष अशी महायुती सत्तेत आहे. या महायुतीकडे एकूण 118 नगरसेवक असून बहुमताचा आकडा 114 आहे. त्यामुळे मुंबईचे महापौरपद महायुतीलाच मिळणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. आरक्षण खुल्या प्रवर्गासाठी असल्याने महापौरपदावर कोणताही ओबीसी, एससी किंवा एसटी आरक्षणाचा अडसर राहिलेला नाही. मात्र हे पद महिलांसाठी राखीव असल्यामुळे महिला नगरसेविकांमधूनच महापौर निवड होणार आहे.आरक्षण सोडत जाहीर होण्यापूर्वी भाजपकडून सातत्याने महायुतीचा महापौर बसेल, असे संकेत दिले जात होते. आता आरक्षण स्पष्ट झाल्यानंतर भाजपकडून महापौरपदावर दावा करण्याची शक्यता अधिक बळावली आहे. कारण भाजपकडे मुंबईत खुल्या वर्गातील मोठ्या संख्येने महिला नगरसेविका निवडून आल्या आहेत. त्यामुळे भाजपमध्येच अनेक नावांची चर्चा सुरू झाली आहे.

भाजपकडून महापौरपदासाठी ज्या महिला नगरसेविकांची नावे चर्चेत आहेत, त्यामध्ये राजश्री शिरवडकर, अलका केरकर, हर्षिता नार्वेकर, रितू तावडे, आशा मराठे आणि शितल गंभीर यांचा समावेश आहे. याशिवाय मालाडमधून मोठ्या मताधिक्क्याने विजयी झालेल्या योगिता सुनील कोळी यांचे नावही महापौरपदासाठी चर्चेत आहे.

# NCP च्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार का?:सुनील तटकरे

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाविषयी एक सूचक विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस या प्रकरणी उत्सुक नाही, पण तशी एखादी परिस्थिती उद्भवली तर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सत्ताधारी एनडीए सोबत असल्याची बाबही आवर्जून निदर्शनास आणून दिली.राज्यातील महापालिका निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची अत्यंत सुमार कामगिरी झाली. अनेक ठिकाणी या पक्षांना मानहाणीकारक पराभव पत्करावा लागला. यामुळे या दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चेने चांगलाच जोर धरला आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी गुरुवारी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना उपरोक्त विधान केले आहे. ते म्हणाले, मी याविषयी फार काही बोलू शकत नाही. कारण, विलीनीकरण हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. आम्ही भाजपप्रणित एनडीएचा भाग आहोत हे या प्रकरणी प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) विलीनीकरणासाठी उत्सुक नाही. पण तशी एखादी परिस्थिती उद्भवली, तर योग्य तो निर्णय घेतला जाईल. पण आम्ही महाराष्ट्रात महायुतीत व राष्ट्रीय पातळीवर एनडीएचे भाग आहोत व पुढेही राहू हे मी या प्रकरणी स्पष्ट करतो. सुनील तटकरेंनी यावेळी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका दोन्ही पक्ष एकत्र लढण्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, जिथे शक्य असेल तिथे दोन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढतील. पण जिथे आघाडी शक्य नसेल, तिथे दोन्ही पक्ष वेगवेगळे लढतील. महापालिका निवडणुकीत आम्ही जे सूत्र वापरले, तेच सूत्र इथून पुढेही वापरले जाईल. अजित पवारांनी



यासंबंधीची भूमिका यापूर्वीच स्पष्ट केली आहे. पण आम्ही एकत्र निवडणूक लढवली, तर आम्हाला एकाच चिन्हावर लढावे लागेल. एकत्र लढल्यास तुतारी किंवा घड्याळ या दोन्हीपैकी एका चिन्हावर निवडणूक लढवावी लागू शकते, असे तटकरे म्हणाले.

# छत्रपती संभाजीनगरचा महापौर कोण?:भाजपमध्येच नावांची रस्सीखेच, सावे-कराडांची भूमिका निर्णायक; महापौरपदासाठी संघर्ष तीव्र; आठ जणांची जोरदार चर्चा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर- मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर महापालिकेत महापौरपदासाठीचा मार्ग अखेर मोकळा झाला असून आता सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराला महापौर होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. महापालिकेचा निकाल जाहीर झाला असला तरी खऱ्या अर्थाने सत्तासंघर्षाला आता सुरुवात झाली आहे. कारण भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी महापौरपदासाठी कोणता चेहरा पुढे येणार, याबाबत पक्षांतर्गत हालचाली वेगाने सुरू आहेत. विशेषतः महापौरपदाच्या उमेदवाराची निवड करताना मंत्री अतुल सावे कोणत्या नावाला पसंती देतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.


छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी करत 57 नगरसेवक निवडून आणले आहेत. बहुमतासाठी भाजप केवळ एका जागेने कमी पडला असला, तरी प्रत्यक्ष राजकीय गणित पाहता स्वतंत्रपणे 'कमळ' चिन्हाचा महापौर बसण्याचे चित्र सध्या स्पष्ट दिसत आहे. भाजपला पाठिंबा देणारा एक नगरसेवक नेमका कोण असेल, हे अद्याप जाहीर झालेले नसले तरी, शहराचा कारभार सक्षमपणे आणि स्थिरपणे हाताळू शकणाऱ्या उमेदवारालाच महापौरपदी बसवावे, अशी भूमिका समर्थकांकडून मांडली जात आहे.महापौरपदाच्या शर्यतीत सध्या अनेक नावांची चर्चा सुरू आहे. यामध्ये अनिल मकरिये, राजगौरव वानखेडे, महेश माळवतकर, विजय औताडे, शिवाजी दांडगे, समीर राजूरकर, सुरेंद्र कुलकर्णी आणि रेणुकादास वैद्य ही नावे पुढे आली आहेत. विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीत प्रमुख म्हणून काम पाहिलेले समीर राजूरकर यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर मानले जात आहे. निवडणूक व्यवस्थापनातील त्यांचा अनुभव आणि पक्षातील सक्रिय भूमिका यामुळे ते महापौरपदाचे मजबूत दावेदार असल्याचे बोलले जात आहे.

भाजपमधील अंतर्गत चर्चांमध्ये केवळ राजकीय ताकद नव्हे, तर प्रशासकीय समज, कायद्याचे ज्ञान आणि सभागृहातील कामकाजाची जाण या बाबींनाही महत्त्व दिले जात असल्याचे संकेत मिळत आहेत. महाराष्ट्र नगरपंचायत आणि नगरपालिकांच्या कायद्याचे सखोल ज्ञान असलेला, सर्वसाधारण सभेत स्पष्टपणे भूमिका मांडणारा आणि पारदर्शकतेचा आग्रह धरणारा मूळ भाजपचा नगरसेवक महापौर व्हावा, अशी मागणी पक्षातील काही नेत्यांकडून होत आहे. त्यामुळे केवळ लोकप्रियता नव्हे, तर प्रशासन चालवण्याची क्षमता हा निकष महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, आरक्षणाच्या मुद्द्यावरही मोठी चर्चा रंगली होती. जर महापौरपद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाले असते, तर भाजपची मोठी कोंडी झाली असती, अशी प्रतिक्रिया अनेक नेत्यांकडून व्यक्त होत होती. कारण त्या श्रेणीतून भाजपकडे उमेदवार नसून फक्त एमआयएमकडेच उमेदवार उपलब्ध होते.

## फॅशन...

### इक चाय तो पिलाना...म्हणत सुखदा खांडेकेकर शेअर केले खास फोटो,स्टाईल पाहून तुम्हा देखील व्हाल थक्क



अभिनेत्री सुखदा खांडकेकर हिने आसाममधील काही खास क्षण चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. पांढऱ्या टी-शर्टमध्ये दिसणारा तिचा हा साधा, आरामदायी आणि नैसर्गिक अंदाज सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. नेहमीच पारंपरिक साड्या, स्टायलिश ड्रेस किंवा ग्लॅमरस लूकमध्ये झळकणारी सुखदा यावेळी मात्र प्रवासासाठी योग्य असा अगदी सोपा लूक करताना दिसते. या फोटोंमध्ये कोणताही दिखावा नाही, ना हेव्ही मेकअप फक्त मोकळेपणा आणि आत्मविश्वास. हलकं स्मितहास्य, नैसर्गिक भाव आणि निसर्गाच्या सान्निध्यातील शांत वातावरण यामुळे तिचं सौंदर्य अधिकच खुलून आलं आहे. आसामच्या हिरव्या चहाच्या मळ्यांच्या पार्श्वभूमीवर हा पांढरा टी-शर्ट लूक अतिशय युनिक वाटतो. सुखदाचा हा अंदाज पाहून चाहत्यांनी सोशल मीडियावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. फॅशन म्हणजे केवळ महागडे कपडे किंवा मेकअप नव्हे, तर व्यक्तिमत्त्वाला साजेसा आत्मविश्वास हे सुखदाने पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे. पांढरा टी-शर्ट, हलका मेकअप, मोकळे केस आणि नैसर्गिक हास्य या सगळ्यामुळे तिचा लूक अतिशय फ्रेश आणि एलिगंट वाटतो. पांढऱ्या रंगाची साधी टी ही कोणत्याही वॉर्डरोबमधील 'एव्हरग्रीन' गोष्ट. त्यातच आसामच्या हिरवळीचा, चहाच्या मळ्यांचा आणि शांत वातावरणाचा बॅकड्रॉप लाभल्याने हे फोटो अधिकच उठावदार झाले आहेत. फोटोसोबत दिलेलं "इक चाय तो पिलाना..." हे कॅप्शनही चाहत्यांच्या पसंतीस उतरलं आहे. आसाम म्हटलं की चहा आणि चहासोबत गप्पा, निवांतपणा, प्रवासातले क्षण आठवतात. या एका ओळीतून सुखदाने त्या ठिकाणाचा मूड, तिची मनःस्थिती आणि चाहत्यांशी असलेली आपुलकी सगळं काही व्यक्त केलं आहे.सुखदा खांडकेकरच्या हेअरस्टाईल बद्दल बोलायचं झालं, तर ती नेहमीच साधेपणा आणि ग्लॅमर यांचा सुंदर संगम दाखवते. तिच्या या लूकसाठी तिने तिचे केस हाय टाय केले होत. तिच्या या लुक वरून कोणाचे लक्ष हटत नाही आहे. साध्या पांढऱ्या टी-शर्ट, हलक्या जीन्स किंवा आरामदायी कपड्यांत तिचा लूक फ्रेश, नैसर्गिक आणि रिलॅक्स्ड दिसतो. नेहमीच ग्लॅमरस ड्रेसेस आणि स्टाइलिश मेकअपमध्ये दिसणारी सुखदा यावेळी नैसर्गिकतेतच भारी ठरली आहे. हसणारे, मोकळे केस, हलका मेकअप आणि आत्मविश्वास ही सगळीकच साधी पण प्रभावी गोष्ट आहे. साधेपणातही तिचा सौंदर्य, ग्रेस आणि स्टाइल स्पष्टपणे दिसतो. सोशल मीडियावर चाहत्यांनी देखील या लूकचं कौतुक केलं आहे. सुखदाच्या या फोटोवर चाहत्यांनी अक्षरशः कौतुकाचा वर्षाव केला आहे. "किती साधी आणि सुंदर", "नॅचरल ब्युटी", "हा लूक खूप रिफ्रेशिंग आहे" अशा कमेंट्स मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. काही चाहत्यांनी तर "पांढऱ्या टी शर्टमध्येही तुम्ही इतक्या ग्रेसफुल कशा?" असंही विचारलं आहे. सोशल मीडियावर तिचा हा लूक 'मिनिमल फॅशन'चं उत्तम उदाहरण ठरत आहे.

### महाराष्ट्राची हास्यजत्रा'फेम नम्रता संभेरावचा मराठमोळा साज, साडीवरील चंद्रकोरने वेधले लक्ष



मराठी मनोरंजनविश्वात सध्या एक नाव विशेष चर्चेत आहे आणि ते म्हणजे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम नम्रता संभेराव. आपल्या सहजसुंदर अभिनयाने, अफलातून कॉमिक टायमिंगने आणि साध्या, आपुलकीच्या स्वभावाने प्रेक्षकांची मने जिंकणारी नम्रता यावेळी वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आली आहे. नुकताच तिचा पारंपरिक साडीतील फोटोशूट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, तिचा हा मराठमोळा साज चाहत्यांना अक्षरशः भुरळ घालत आहे.या फोटोशूटमधील नम्रताचा लूक पाहताच तिच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. कोणताही अति झगमगाट न करता, अत्यंत सोज्वळ आणि संस्कृतीची आठवण करून देणाऱ्या अंदाजात ती दिसत आहे. साडीतील तिचा आत्मविश्वास, चेहऱ्यावरचं नैसर्गिक हास्य आणि पारंपरिकतेचा अभिमान या सगळ्यांचा सुंदर मेळ या फोटोशूटमध्ये पाहायला मिळतो. विशेष म्हणजे, आजच्या आधुनिक फॅशनच्या युगातही पारंपरिक पेहराव किती प्रभावी आणि आकर्षक ठरू शकतो, हे नम्रताने आपल्या या लूकमधून पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे. सोशल मीडियावर "खऱ्या अर्थाने मराठमोळी अभिनेत्री" अशा प्रतिक्रिया देत चाहते तिच्या या अवताराचं भरभरून कौतुक करत आहेत. या फोटोशूटमध्ये नम्रता संभेरावने परिधान केलेली साडी पाहताक्षणीच लक्ष वेधून घेते. अत्यंत साध्या पण तितक्याच उठावदार रंगसंगतीतील ही साडी तिच्या व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसते. कोणताही अतिरेक न करता, सोज्वळ आणि मराठी परंपरेचा गंध जपणारा हा लूक आजच्या तरुणाईलाही आवडणारा ठरत आहे. साडीची नाजूक घडी, पल्लूची रचना आणि एकूणच पेहरावातून 'मराठमोळेपणा' ठळकपणे जाणवतो.

या संपूर्ण लूकमधील सर्वात खास आणि लक्षवेधी बाब म्हणजे साडीवरील चंद्रकोर डिझाइन. मराठी संस्कृतीत चंद्रकोरला विशेष महत्त्व आहे. पेशवाई परंपरेपासून ते सण-समारंभांपर्यंत चंद्रकोर ही अभिमानाची आणि ओळखीची खूण मानली जाते. नम्रताच्या साडीवरील ही चंद्रकोर केवळ डिझाइनपुरती मर्यादित न राहता, तिच्या लूकला पूर्णत्व देते. अनेक चाहत्यांनी सोशल मीडियावर कमेंट करत "खऱ्या अर्थाने मराठमोळी नायिका" अशी तिची प्रशंसा केली आहे.

नम्रताच्या या फोटोशूटमध्ये मेकअप अतिशय सौम्य आणि नैसर्गिक ठेवण्यात आला आहे. हलका बेस, मृदू आयशॅडो आणि नाजूक लिपशेड यामुळे तिच्या चेहऱ्यावरील नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलून दिसते. कपाळावरची छोटीशी कुंकवाची टिकली लूकला पारंपरिक स्पर्श देते. दागिन्यांच्या बाबतीतही तिने फारसा झगमगाट न करता, पारंपरिक कानातले आणि साधे गळ्यातले असा संतुलित पर्याय निवडला आहे. त्यामुळे साडी आणि चंद्रकोर डिझाइन अधिक उठून दिसते. या मराठमोळ्या लूकसाठी नम्रताने निवडलेली हेअरस्टाईलही तितकीच महत्त्वाची आहे.

# लवकरच चढणार बोहल्यावर? इन्फ्लूएन्सरने स्वत:चं केलेला खुलासा; म्हणाली, 'दोन वर्षात..

मुंबई - ' बिग बॉस मराठी ६ ' मधील अनुश्री माने सध्या चर्चेत आहे. बिग बॉसच्या घरात अनुश्रीनं तिचे खरे रंग दाखवायला सुरुवात केली असून तिनं राकेश बापटसोबत पंगा घेतला. घरातले इतर स्पर्धक समजावत असतनाही अनुश्री ऐकली नाही आणि तिनं पराचा कावळा केला. अनुश्री राकेशला बेडवर झोपायला देत नव्हती, इतर स्पर्धकही तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, अनुश्री ऐकत नव्हती. त्यामुळे राकेशनं अनुश्रीला उठवण्याचा प्रयत्न केला. त्यावरून दुसऱ्या दिवशी तिनं आकांडतांडव करत, 'माझ्या परवानगीशिवाय हात लावायचा नाही' असं म्हणाली. राकेशवर तिनं घाणेरडा आरोप केला. त्यामुळे अनुश्री चर्चेत आली. या चर्चेदरम्यान अनुश्रीच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सोशल मीडियावर चर्चाही सुरू झाल्या. गेल्या वर्षीच्या एका मुलाखतीमध्ये अनुश्रीनं लग्नाबद्दल भाष्य केलेलं.

अनुश्री माने तिच्या मावस बहिणीच्या दीराला डेट करत होती. दोघांमध्ये आठ वर्षांचं अंतर होतं. अनुश्री त्याच्यासोबत फोटोही शेअर करायची. अनुश्रीच्या बॉयफ्रेंडचं नाव अर्जुन मोरे होतं. अनुश्री आणि अर्जुन सोशल मीडियावर रील्स शेअर करायचे. मात्र, २०२४ मध्ये त्यांचा ब्रेकअप झाल्याचं समोर आलं. अनुश्री आणि अर्जुनला काका-पुतणीची जोडी म्हटलं जायचं.

'साई-प्रिया लाईफ' या युट्युब चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये अनुश्रीला लग्नाबद्दल विचारण्यात आलेलं. त्यावर अनुश्री म्हणालेली की, 'मी दोन वर्षात लग्न करणार आहे. येत्या दोन वर्षात माझं शुभमंगल सावधान होणार आहे' आता अनुश्रीची ही मुलाखत सोशल मीडियावर व्हायरल होत असून अनुश्री कधी लग्न करणार? आणि तिचा होणारा नवरा कोण असेल? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान, 'कलर्स मराठी'नं शेअर केलेल्या आजच्या 'बिग बॉस मराठी ६'च्या प्रोमोमध्येही पुन्हा अनुश्री राकेशसोबत वाद घालताना दिसतेय. त्याचबरोबर तिनं कालच्या भागातही तन्वीबद्दललावालावी करायची कामं केली. तन्वीचं नाव विशाल कोटियनसोबत जोडलं. त्यामुळे आता अनुश्रीच्या या वागण्यावर प्रेक्षक चांगलेच संतापले असून त्यांनी अनुश्रीला बिग बॉसमधून काढण्याची मागणी केली आहे.



## हास्यजत्रा फेम ओंकार राऊत कधी अडकणार लग्नबंधनात ?

मुंबई - ' महाराष्ट्राची हास्यजत्रा ' हा लोकप्रिय कार्यक्रम असून त्यातील कलाकारसुद्धा कायम चर्चेत असतात. या कार्यक्रमानं अनेक नवोदित कलाकारांना इंडस्ट्रीमध्ये नांव कमावण्याची संधी दिली. शिवाली परब, ओंकार भोजने, प्रदर्शिनी इंदलकर, वनिता खरात, निखिल बने यांसारखे कलाकार हास्यजत्रेमुळे लोकप्रिय झाले. या कलाकारांना मोठ्या पडद्यावर झळकण्याची संधी मिळाली. या कलाकारांसोबतच हास्यजत्रेतील आणखी एक कलाकार कायम चर्चेत असतो. तो म्हणजे, ' ओंकार राऊत ' ओंकार राऊतनं मालिकांमध्येही काम केलं असलं तरी हास्यजत्रेनं प्रसिद्धी मिळाली. ओंकार त्याच्या कामासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असतो. अशातच आता एका मुलाखतीमध्ये ओंकारच्या आई-बाबांनी अभिनेत्याच्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे.

'MHJ Unplugged'ला ओंकार राऊतनं मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान व्हिडिओ कॉलद्वारे ओंकार राऊतच्या आई-वडिलांसोबत संवाद साधण्यात आलेला. अमित फाळके यांनी ओंकार राऊतच्या आई-बाबांना विचारलं की, 'ओंकारचं असं म्हणणं आहे की, आई म्हणतेय ९ ते ५ नोकरी करायला पाहिजे. वेळेवर लग्न करायला पाहिजे, पण वेळेवर म्हणजे नक्की कधी लग्न करणार आहे मुलगा?' त्यावर ओंकारचे बाबा म्हणाले की, 'आम्ही यावर विश्वास ठेवतो, लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात' पुढे, ओंकारची आई म्हणते, 'मला वाटतं, लवकरच येईल ती'

ओंकारच्या करिअरबद्दल बोलताना अभिनेत्याची आई म्हणाली की, 'आमच्या घरातला चैतन्य आहे. त्याने असंच काम करत राहावं. त्याने नाटक मात्र सोडायचं नाही, ते सतत करत राहायचं' लेकाला काय सांगाल? असं विचारलं असता ओंकारची आई म्हणाली, 'चांगलं काम करत राहायचं आणि सतत काम करत राहायचं' त्यामुळे आता ओंकार राऊत कधी लग्नबंधनात अडकतोय, याकडे सर्वांचं लक्ष वेधलं आहे.



## 'मला आई व्हायचं नाहीये' मातृत्वाबद्दल स्पष्टच बोलली 'तारक मेहता...' फेम बबिता

मुंबई - 'तारक मेहता का उल्टा चष्मा' फेम मुनमुन दत्ता सध्या तिच्या एका मुलाखतीमुळे चर्चेत आहे. या मुलाखतीदरम्यान अभिनेत्रीनं तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल भाष्य केलं. त्याचबरोबर मुनमुन दत्तानं मातृत्वाबद्दलही तिचं मत व्यक्त केलं आहे.

मुनमुन दत्ताला 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या मालिकेमुळे प्रसिद्धी मिळाली आणि ती घराघरात पोहोचली. या मालिकेमध्ये तिनं साकारलेली 'बबिता'ची भूमिका चांगलीच गाजली. अभिनेत्रीला प्रेक्षक 'बबिता' म्हणूनच ओळखतात. मुनमुन सोशल मीडियावर कायम सक्रीय असते आणि तिच्याविषयीचे अपडेट्स चाहत्यांना देते. मात्र, अभिनेत्री लग्न कधी करणार? असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला आहे. मुनमुन स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. अशातच आता रणवीर अलाहाबादियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये मुनमुनने तिच्या लग्नाबद्दल आणि मातृत्वाच्या विचारांबद्दल भाष्य केलं आहे.

मुलाखतीदरम्यान मुनमुनला तिच्या ग्लोइंग स्कीनबद्दल विचारण्यात आलं. त्यावर अभिनेत्री म्हणाली, 'मी लग्न केलं नाहीये आणि मला मुलं नाहीयेत, त्यामुळे त्याचा ताण नाहीये म्हणून कदाचित माझी त्वचा इतकी छान आहे' याचदरम्यान अभिनेत्रीला मातृत्वाबद्दल विचारण्यात आलं. त्यावर मुनमुन म्हणाली, 'मला आई व्हायचं नाहीये आणि या बाबतीत माझे विचार स्पष्ट आहेत. कोणीही माझ्याबद्दल बोललं तरी मला काही फरक पडत नाही. हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय आहे. हे माझं मत आहे.'

याच मुलाखतीदरम्यान मुनमुनला लग्नाबद्दल विचारण्यात आलेलं. त्यावर अभिनेत्री म्हणाली, 'मी लग्न करेन की नाही हे मला माहीत नाही. जर माझ्या नशिबात लग्न असेल तर होईलच. पण, लग्नाच्या मागे धावणारी मुलगी मी नाही. लग्न हे माझं स्वप्न कधीच नव्हतं' तसंच जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षांबद्दल विचारलं असता मुनमुन म्हणाली, 'जी चांगली दिसतात, ज्यांना उत्तम प्रकारे बोलता येतं, जे समजदार असतील, ज्यांच्याकडे पैसे असतील, अशी मुलं मला आवडतात. मी खोटं बोलत नाही नाही, त्यामुळे एका मुलात हे सगळे गुण असले पाहिजेत असं मला वाटतं.'



## मित्राची पलाश मुच्छलकडून 40 लाखांची फसवणूक सांगली पोलीस अधीक्षकांकडं तक्रार दाखल

मुंबईः संगीतकार आणि दिग्दर्शक पलाश मुच्छल गेल्या काही महिन्यापासून सतत चर्चेत आहे. स्टार क्रिकेटपटू स्मृती मानधनासोबत लग्न मोडल्यानंतर त्याच्यावर नात्यात फसवणूक केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले होते. आता त्याच्यावर आर्थिक फसवणुकीचे आरोप करण्यात आल्यानं एकच खळबळ उडाली आहे.पलाश मुच्छलयानं सांगलीतल्या एका युवकाची जो सिनेइंडस्ट्रीशी जोडला गेला आहे, त्याची तब्बल ४० लाखांना फसवणूक केल्याचं प्रकरण समोर आलं आहे. स्मृती मानधनाच्या कुटुंबियांच्या ओळखीचा असलेला विज्ञान माने या युवकानं या प्रकरणी पोलिस धाव घेतली आहे. विज्ञान माने यानं बुधवारी म्हणजेच २१ जानेवारी रोजी सायंकाळी सांगलीच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांकडं तक्रार दाखल केल्याचं वृत्त एबीपी या वृत्त वाहिनीनं दिलं आहे. या तक्रारीमुळं एकच खळबळ उडाली आहे.

तर विज्ञान माने हा युवक मराठी सिनेइंडस्ट्रीशी जोडला गेला आहे. यानं काही सिनेमांसाठी फायनान्सर म्हणून काम पाहिलंय. तसंच तो स्मृती मानधनाचा बालमित्र असल्याचं म्हटलं जातंय.पलाश जेव्हा सांगतलीत आला होता तेव्हा, स्मृतीच्या वडिलांनी त्याची ओळख विज्ञानसोबत करून दिली होती. यानंतर पलशानं विज्ञानला 'नजरिया' या त्याच्या सिनेमात गुंतवणूक करण्यास सुचवलं होतं. त्यानुसार विज्ञानने या सिनेमात तब्बल ४० लाख गुंतवले. सिनेमा ओटीटीवर प्रदर्शित झाल्यानंतर गुंतवलेली रंक्कम परत मिळेल, असं आश्वासनही पलाशनं त्याला दिलं होतं. पण आता बराच काळ उलटून गेल्यानंतरही सिनेमाचं काम पूर्ण झालं नाहीये. त्यामुळं गुंतवलेली रक्कम परत द्यावी अशी मागणी विज्ञानने पलाशकडे केली. पण अनेकदा याबद्दल मागणी करूनही पलाशकडून समाधानकारक उत्तर मिळालं नाही. पलाशनं विज्ञानचा फोन उचलणंही टाळलं आणि नंबरही ब्लॉक केलाय. यानंतर विज्ञानने या प्रकरणी पोलिसांकडे धाव घेतली आहे.

आपले पैसे परत न मिळाल्यानं विज्ञान माने या युवकानं सांगली जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे आर्थिक फसवणूक झाल्याची अधिकृत तक्रार दाखल केली आहे.



## कलाविश्वावर शोककळा!

### लोकप्रिय अभिनेते कमल रॉय यांचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन

मुंबई - प्रसिद्ध अभिनेत्री उर्वशी आणि कल्पना यांचे भाऊ अभिनेता कमल रॉय यांचं वयाच्या 54व्या वर्षी चेन्नई येथे निधन झालं असून कलाविश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कमल रॉय हे प्रसिद्ध नाट्य अभिनेते छावरा व्ही.पी. नायर आणि विजयालक्ष्मी यांचे पुत्र होते. कमल यांचे आजोबा, सुरनंद कुंजन पिल्लई, एक प्रसिद्ध कोशकार, इतिहासकार, कवी आणि समीक्षक होते.



अभिनेते कमल रॉय यांचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. द हिंदू वृत्तानुसार, कमल रॉय यांनी चेन्नई येथे अखेरचा श्वास घेतला. ते बऱ्याच काळापासून चित्रपटसृष्टीत सक्रीय नव्हते, पण त्यांचा चाहतावर्ग मोठा होता.. त्यांनी बहुतेक खलनायकाच्या भूमिका साकारल्या. त्यांच्या खलनायकी भूमिकांसाठी ते विशेषतः प्रसिद्ध होते.

दिग्दर्शक विनयने कमल रॉय यांच्या आठवणी शेअर करत लिहिलं, 'अभिनेता कमल रॉय यांचे निधन झालं आहे. याबद्दल मी शोक व्यक्त करतो. माझ्या 'कल्याण सौगंधिकम' या चित्रपटात त्यांनी दिलीपच्या खलनायकाची भूमिका साकारली होती. कमल हे अभिनेत्री उर्वशी, कल्पना आणि कलारंजिनी यांचे भाऊ होते.'

कमल यांचं करिअर त्यांच्या बहिणींइतकं प्रसिद्ध नव्हतं, तरी कमल यांनी अभिनयातही हात आजमावला होता, त्यांनी 'सयुज्यम' (१९७९), 'कोलिलक्कम' (१९८१), 'मंजू' (१९८३), 'किंगिनी' (१९९२), 'कल्याण सौगंधिकम' (१९९६), 'वाचलम' (१९९७), 'शोभनम' (१९९७) आणि 'द किंगमेकर लीडर' (२००३) यांसारख्या चित्रपटांमध्ये महत्वपूर्ण भूमिका साकारली. मोहनलाल यांच्या 'युवजनोत्सवम' (१९८६) मधील 'एनुमेंटे कन्नुनिराल' या लोकप्रिय गाण्यात ते दिसले होते. त्यांनी 'शारदा'सारख्या दूरदर्शन मालिकांमध्येही काम केलं.

## अर्थविश्व...

# कंपनीच्या तिमाही नफ्यात वाढ, गुंतवणूकदारांना सलग तिसऱ्यांदा डिव्हिडंडच गिफ्ट, शेअरमध्येही तेजी



एका डिपॉजिटरी कंपनीने डिसेंबर तिमाहीसाठीचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत, ज्यात नफा आणि महसूल दोन्हीमध्ये वार्षिक वाढ दिसून आली आहे. त्यामुळे शेअरधारकांसाठी लाभांशाची घोषणा कंपनीकडून करण्यात आली आहे. ही कंपनी आहे CAMS असून रेकॉर्ड तारीख ही जाहीर केली आहे. विशेष म्हणजे कंपनीचा नफा हा बाजाराच्या अपेक्षांपेक्षा जास्त आहे.कॅम्स (CAMS) या डिपॉजिटरी कंपनीने शेअर धारकांसाठी 3.5 रुपये प्रति शेअर या दराने अंतरिम लाभांशाची घोषणा केली आहे. कॅम्सचा एकत्रित नफा 126 कोटी रुपये राहिला आहे, जो मागील वर्षीच्या याच तिमाहीतील 125.5 कोटींवरून वाढला आहे. बाजाराचा अंदाज 122 कोटी रुपयांचा होता, त्यामुळे कंपनीने अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. कंपनीचा एकत्रित महसूल 390 कोटी रुपयांवर पोहोचला आहे, जो मागील वर्षीच्या याच तिमाहीतील 370 कोटींपेक्षा जास्त आहे. कॅम्सच्या लाभांशासाठी 30 जानेवारी 2026 ही रेकॉर्ड तारीख निश्चित करण्यात आली आहे. या तारखेपर्यंत ज्या गुंतवणूकदारांकडे कंपनीचे शेअर्स असतील, त्यांना या लाभांशाचा फायदा मिळेल. कंपनीने 15 डिसेंबर रोजी स्टॉक स्प्लिटची घोषणा केली होती. यापूर्वी 7 नोव्हेंबर 2025 रोजी 14 रुपयांचा अंतरिम लाभांश, 8 ऑगस्ट 2025 रोजी 11 रुपयांचा अंतरिम लाभांश आणि 15 जुलै रोजी अंतिम लाभांशाची घोषणा करण्यात आली होती. CAMS च्या शेअरमध्ये दिवसाअखेर 10.16 रुपयांची वाढ झाली होती. दिवसाच्या सत्रात शेअरने ₹742 चा इंट्राडे उच्चांकही गाठला होता. 30 जून 2025 रोजी शेअरने 875 चा 52-आठवड्यांचा उच्चांक गाठला होता. तर, 3 मार्च 2025 रोजी शेअरने ₹606 च्या पातळीवर 52-आठवड्यांचा नीचांक नोंदवला होता. गेल्या एका वर्षात शेअरने नकारात्मक परतावा दिला आहे. मागील एका वर्षात शेअरमध्ये 12% ची घट झाली आहे. सहा महिन्यांत 15%, तीन महिन्यांत सुमारे 7%, एका महिन्यात 6% आणि गेल्या दोन आठवड्यांत शेअर 4% घसरला आहे.

## स्वस्ताईला भुलू नका! सोन्याबाबत बाबा वेंगाची भविष्यवाणी खरी ठरतेय?



बाबा वेंगा यांची अनेक भाकिते याआधी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाले आहेत. बाबा वेंगांच्या काही भविष्यवाण्यांशी जुळणाऱ्या घटनांच्या असंख्य उदाहरणे असून सोन्याच्या किमतींबद्दल बाबा वेंगांच्या अलिकडच्या भविष्यवाणीबद्दल बरीच उत्सुकता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसात बऱ्याच अस्थिरतेनंतर सोन्याच्या दरांनी ऐतिहासिक झेप घेतली तर गुरुवारी खरेदीदारांना काहीसा दिलासा असताना सोन्याच्या किमतींबद्दल बाबा वांगाच्या भविष्यवाण्या अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत, ज्यामुळे विविध मीडिया प्लॅटफॉर्मवर असंख्य चर्चा आणि वादविवाद सुरू होत आहेत. सोन्याच्या भावातील अलीकडच्या ऐतिहासिक दरवाढीनंतर बाबा वेंगांची भविष्यवाणी खरी ठरताना दिसत आहे. भू-राजकीय संघर्ष, आर्थिक समस्या आणि शेअर बाजारातील चढ-उतारांमुळे निर्माण झालेली जागतिक अनिश्चितता यामुळे अनेक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या सोन्याकडे वळले आहेत. गेल्या दहा वर्षांत जगभरातील मध्यवर्ती बँकांनी देखील मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करून या दरवाढीच्या आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. एकूण जागतिक कर्ज अंदाजे $338 ट्रिलियनवर पोहोचले आहे, जे जगाच्या जीडीपीपेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत, जागतिक कर्जात वाढ झाल्याने बाजारात एक मोठा बुडबुडा तयार होत असल्याची भीती निर्माण झाली, जो फुटला तर आणखी एक आर्थिक संकट निर्माण होऊ शकते. गुंतवणूकदार सोन्याला कमी जोखीम असलेली सुरक्षित गुंतवणूक मानतात. म्हणूनच सोन्याच्या किमतीत सतत वाढ होत असल्याने आता अनेकांमध्ये चिंता निर्माण झाली असूनबाबा वेंगांचे भाकीत लक्षात घेता बहुतेक जण ऐतिहासिक आकडेवारीच्या आधारे सोन्याच्या किमतीत पुन्हा वाढ होईल का असा अंदाज लावत आहेत.

सोन्याचा ऐतिहासिक उच्चांक

बुधवारी नवीन विक्रमी उच्चांक गाठला असून कमकुवत अमेरिकन डॉलर आणि ग्रीनलँड संघर्षाच्या पार्श्वभूमीवर वाढत्या तणावामुळे सुरक्षित गुंतवणुकीची मागणी वाढल्यामुळे भाव आतापर्यंतच्या उच्चांकी शिखरावर पोहोचले. सुरक्षित गुंतवणुकीच्या मागणीमुळे सोन्याची किंमत वाढत असून अमेरिकन बाजारात स्पॉट सोन्याच्या किमतींनी पहिल्यांदाच प्रति औंस $4800 चा टप्पा ओलांडला. तसेच चांदीच्या किमती देखील प्रति औंस $95.87 च्या उच्चांकावर पोहोचल्या आहेत.

व्हायरल होतेय बाबा वेंगाची भविष्यवाणी

मागील काही दिवसातील ऐतिहासिक उच्चांकी झेप आणि गुरुवारच्या घसरणीनंतर आता सोशल मीडियात सोन्याच्या किमतींबद्दल बाबा वांगाची भाकिते व्हायरल होत आहेत, जी लोकांना विचार करायला भाग पाडत आहेत. गुरुवारी दिवसभरात खरेदी करणाऱ्यांना सोन्याच्या दरांनी काहीसा दिलासा दिला असला तरी वाढत्या किमतींमुळे बाबा वेंगांचे भाकित खरी ठरेल अशी लोकांना चिंता सतावत आहे.

बाबा वेंगांच्या व्हायरल भाकितानुसार, आर्थिक संकटाचा पारंपारिक बँकिंग व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. यामुळे लोक सोन्यासारख्या फिजिकल मालमत्तेकडे झुकू लागतील. अशा स्थितीत, सोन्याच्या किमती 25 ते 40 टक्क्यांनी वाढू शकतात असा बाबा वेंगांचा अंदाज आहे.तुम्ही सोने किंवा चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदवार्ता घेऊन आला आहे. सोन्याच्या किमतीतही आज मोठी घसरण झाली असून तुम्ही लग्नसराई किंवा गुंतवणुकीसाठी सोने किंवा चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर दरातील ही घसरण खरेदीसाठी एक उत्तम संधी असू शकते.

# WPL मध्ये गुजरात जायंट्सचा तिसरा विजय:यूपी वॉरियर्सला 45 धावांनी हरवले; सोफी डिव्हाईनची अर्धशतकीय खेळी आणि 2 विकेट

सोफी डिव्हाईनच्या अष्टपैलू कामगिरीमुळे विमेन्स प्रीमियर लीगमध्ये गुजरात जायंट्सने आपला तिसरा सामना जिंकला. गुरुवारी वडोदरा येथील कोटंबी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात यूपी वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

प्रथम फलंदाजी करताना गुजरातने 20 षटकांत 8 गडी गमावून 153 धावा केल्या, ज्यात सोफी डिव्हाईनची अर्धशतकीय खेळी महत्त्वाची ठरली. लक्ष्याचा पाठलाग करताना यूपी वॉरियर्सचा संघ 17.3 षटकांत केवळ 108 धावांवर ऑलआउट झाला.या विजयासह गुजरात गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. संघाने आतापर्यंत 6 सामन्यांमध्ये 3 विजय आणि 3 पराभव नोंदवले आहेत. तर यूपीला सहाव्या सामन्यात चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले. गुजरातची सुरुवात चांगली झाली नाही आणि संघाने 23 धावांवर पहिली विकेट गमावली. सलामीवीर डॅनी वायट हॉज 14 धावा करून बाद झाली. दुसरीकडे, बेथ मूनीने डाव सांभाळत 34 चेंडूंमध्ये 5 चौकारांच्या मदतीने 38 धावा केल्या. यानंतर अनुष्का शर्मा (14) आणि कर्णधार ॲश्ले गार्डनर (5) लवकर बाद झाल्या.

डिव्हाईनची अर्धशतकीय खेळी

मध्यक्रमात उतरलेल्या सोफी डिव्हाईनने वेगवान फलंदाजी करत 42 चेंडूत 50 धावा केल्या. तिच्या खेळीत 2 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता. मात्र, दुसऱ्या टोकाकडून फारसे सहकार्य मिळाले नाही आणि भारती फुलमाळी (5), कनिका आहुजा (6) आणि काश्वी गौतम (11) स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतल्या.यूपीकडून क्रांती गौड आणि सोफी एकलस्टनने प्रत्येकी 2 बळी घेतले, तर दीप्ती शर्मा आणि क्लो ट्रायॉनला प्रत्येकी एक यश मिळाले.



# मुजीबची टी-20 आंतरराष्ट्रीयमध्ये पहिली हॅटट्रिक

दुबईत खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-20 सामन्यात अफगाणिस्तानने वेस्ट इंडिजचा 39 धावांनी पराभव केला. या विजयासह अफगाणिस्तानने तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी अभेद्य आघाडी घेतली. फिरकीपटू मुजीब उर रहमानने आपल्या टी-20 कारकिर्दीतील पहिली हॅटट्रिक घेतली, तर सेदीकुल्लाह अटल आणि दरविश रसूली यांनी अर्धशतके झळकावली.वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानने 20 षटकांत 4 गडी गमावून 189 धावा केल्या. वेस्ट इंडिजचा संघ 18.5 षटकांत 150 धावांवर सर्वबाद झाला. अफगाण संघाने पहिला सामना 38 धावांनी जिंकला होता. मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना आज संध्याकाळी दुबईतच खेळला जाईल. अटल-रसूली यांच्यात 115 धावांची भागीदारीप्रथम फलंदाजी करणाऱ्या अफगाणिस्तानची सुरुवात खराब झाली आणि 4.5 षटकांत संघाची धावसंख्या 37/2 होती. यानंतर सेदीकुल्लाह अटल आणि दरविश रसूली यांनी तिसऱ्या विकेटसाठी 115 धावांची भागीदारी करत संघाला सावरले. अटलने 42 चेंडूत 53 धावा केल्या, ज्यात 2 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता. रसूलीने 39 चेंडूत 68 धावांची खेळी केली, त्याने 5 चौकार आणि 3 षटकार मारले.शेवटी



अष्टपैलू अजमतुल्लाह उमरजईने 13 चेंडूंमध्ये नाबाद 26 धावांची वेगवान खेळी केली. त्याच्या खेळीत एक चौकार आणि दोन षटकार होते. वेस्ट इंडिजकडून मॅथ्यू फोर्डेने 4 षटकांत 25 धावा देऊन 2 बळी घेतले. शमार जोसेफ आणि रेमन सिमंड्सला प्रत्येकी एक बळी मिळाला.

सेदीकुल्लाह अटल आणि दरविश रसूली यांनी तिसऱ्या विकेटसाठी 115 धावांची भागीदारी केली.सेदीकुल्लाह अटल आणि दरविश रसूली यांनी तिसऱ्या विकेटसाठी 115 धावांची भागीदारी केली.मुजीबला सामनावीर म्हणून निवडले190 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिज संघाने 8 षटकांत 38 धावांवरच 3 विकेट गमावले.

# प्रिटोरिया कॅपिटल्स SA20 सीझन-4 च्या अंतिम फेरीत

प्रिटोरिया कॅपिटल्सने दक्षिण आफ्रिकेच्या SA20 लीगच्या चौथ्या हंगामाच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. कॅपिटल्सने बुधवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या क्वालिफायर सामन्यात दोन वेळच्या विजेत्या सनरायझर्स ईस्टर्न केपचा 7 गडी राखून पराभव केला.

सनरायझर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने 20 षटकांत 7 गडी गमावून 170 धावा केल्या. जॉनी बेअरस्टोने सर्वाधिक 50 धावा केल्या. जॉर्डन हर्मनने 41 आणि कर्णधार ट्रिस्टन स्टब्सने 26 धावांची खेळी केली. कॅपिटल्ससाठी ब्राइस पारसन्सने सर्वाधिक 3 बळी घेतले.

प्रत्युत्तरात प्रिटोरिया कॅपिटल्सने 18.3 षटकांत 3 गडी गमावून लक्ष्य गाठले. कॅपिटल्सकडून ब्राइस पारसन्सने फलंदाजीतही दमदार कामगिरी करत 60 धावा केल्या. डेवाल्ड ब्रेविसने नाबाद 75 धावा केल्या.

कॅपिटल्सचा संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

प्रिटोरिया कॅपिटल्सचा संघ SA20 च्या चार हंगामांमध्ये दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. कॅपिटल्स पहिल्या हंगामाच्या



अंतिम फेरीतही पोहोचला होता, जिथे त्यांना सनरायझर्सकडून पराभव पत्करावा लागला होता. यानंतर पुढील दोन हंगाम कॅपिटल्ससाठी चांगले राहिले नाहीत. हंगाम-2 आणि हंगाम-3 मध्ये संघ पाचव्या स्थानावर राहिला होता.

या सामन्यात पराभव पत्करल्यानंतरही सनरायझर्ससाठी अंतिम फेरीचे दरवाजे अजून बंद झालेले नाहीत. आता संघ शुक्रवारी जोहान्सबर्गमध्ये क्वालिफायर-2 खेळण्यासाठी मैदानात उतरेल. त्या सामन्यात सनरायझर्ससमोर गुरुवारी होणाऱ्या एलिमिनेटर सामन्यातील विजयी संघ असेल.

आयपीएलप्रमाणेच SA20 मध्ये पॉइंट्स टेबलमध्ये टॉप-2 स्थानांवर असलेल्या संघांमध्ये क्वालिफायर-1 खेळला जातो. तर, तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असलेल्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना खेळला जातो.

या हंगामात लीग सामन्यानंतर सनरायझर्सचा संघ पहिल्या आणि कॅपिटल्सचा संघ दुसऱ्या स्थानावर होता. तर, पार्ल रॉयल्स तिसऱ्या आणि जोबर्ग सुपर जायंट्स चौथ्या स्थानावर होता. या दोन्ही संघांमध्येच एलिमिनेटर सामना होईल.

# बाबर-रिझवान आणि शाहीनसोबत 100 कोटींची फसवणूक

## पॉन्झी योजनेचे बळी ठरले, उद्योगपती देश सोडून पळाला; पीसीबीचा तपास सुरू

पाकिस्तानी फलंदाज बाबर आझम, मोहम्मद रिझवान आणि वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी यांच्यासोबत सुमारे 100 कोटी पाकिस्तानी रुपयांची फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. जे पॉन्झी योजनेशी संबंधित आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (PCB) ने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, पाकिस्तानच्या माजी कसोटी कर्णधारासह सुमारे डझनभर खेळाडूंनी PSL शी संबंधित एका व्यावसायिकाच्या योजनेत पैसे गुंतवले होते. सुरुवातीला त्यांना परतावा देखील मिळाला, परंतु आता अचानक त्यांना पैसे मिळणे बंद झाले आहे.

पीडित क्रिकेटपटूंनी व्यावसायिकाशी संपर्क साधला असता, त्यांना सांगण्यात आले की आता पैसे परत मिळणार नाहीत. त्यानंतर त्याने फोन आणि मेसेजला उत्तर देणे बंद केले. तो देश सोडून पळून गेला. असे सांगितले जात आहे की या खेळाडूंनी केवळ स्वतःचेच नव्हे, तर नातेवाईक आणि जवळच्या सहकाऱ्यांचेही पैसे गुंतवले होते. ही रक्कम 100 कोटी पाकिस्तानी रुपयांपर्यंत असल्याचे सांगितले जात आहे.

पाकिस्तान क्रिकेट संघातील सुमारे एक डझन खेळाडूंची फसवणूक झाली आहे. यामध्ये बाबर, रिझवान आणि शाहीन यांच्याशिवाय फखर जमान, शादाब खान यांसारख्या नावांचाही समावेश आहे. असे सांगितले जात आहे की, तो व्यापारी पाकिस्तान सुपर लीगच्या काही फ्रँचायझींच्या स्पॉन्सरशिपशी देखील संबंधित होता.

मोठ्या नुकसानीचा हवाला देत व्यावसायिक फरार झाला

जेव्हा प्रभावित खेळाडूंनी त्याच्याशी संपर्क साधला, तेव्हा व्यावसायिकाने कथितपणे दावा केला की त्याला मोठे नुकसान झाले आहे. ज्यात खेळाडूंची गुंतवणूक रक्कम आणि त्याची स्वतःची पूंजी देखील समाविष्ट आहे. त्याने सांगितले की तो पैसे परत करण्याच्या स्थितीत नाही.

पॉन्झी योजना काय आहे?

पॉन्झी योजना ही एक फसवणुकीची गुंतवणूक योजना असते. यात लोकांना जास्त आणि लवकर नफ्याचे आमिष दाखवले जाते, परंतु प्रत्यक्षात कोणताही व्यवसाय किंवा गुंतवणूक नसते. यात नवीन गुंतवणूकदारांच्या पैशातून जुन्या गुंतवणूकदारांना परतावा दिला जातो. जेव्हा नवीन लोक येणे बंद होते, तेव्हा योजना कोसळते आणि बहुतेक लोकांचे पैसे बुडतात.



# SA20 एलिमिनेटरमध्ये जोबर्ग सुपर किंग्स व पार्ल रॉयल्स आमनेसामने

## सुपर किंग्स कर्णधार विन्स म्हणाला-संघ कोणत्याही एका खेळाडूवर अवलंबून नाही

SA20 2025 च्या एलिमिनेटर सामन्यात गुरुवारी जॉबर्ग सुपर किंग्स आणि पार्ल रॉयल्स आमनेसामने असतील. लीग स्टेजमध्ये दोन्ही संघांचा प्रवास वेगळा राहिला, पण नॉकआउट सामन्यात एकच विजय संघाला क्वालिफायर-2 चे तिकीट मिळवून देईल.

लीग स्टेजमधील कामगिरी

जॉबर्ग सुपर किंग्सने 10 सामन्यांत 22 गुण मिळवून चौथे स्थान पटकावले. संघाने 4 विजय, 4 पराभव आणि 2 अनिर्णित सामने नोंदवले, नेट रन रेट +0.045 राहिला. तर, पार्ल रॉयल्सने 10 सामन्यांत 24 गुणांसह तिसरे स्थान मिळवले. त्यांच्या खात्यात 5 विजय, 4 पराभव आणि 1 अनिर्णित सामना राहिला, मात्र नेट रन रेट





-0.922 राहिला.

JSK चा चढ-उताराचा हंगाम

संपूर्ण हंगामात जॉबर्ग सुपर किंग्सची कामगिरी संमिश्र राहिली, पण महत्त्वाच्या सामन्यांमध्ये संघाने पुनरागमन केले. जेम्स विन्स 216 धावांसह संघाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. मधल्या फळीत डायन फॉरेस्टरने 173.71 च्या स्ट्राइक रेटने 172 धावा केल्या आहेत, तर अकील हुसैनने 7 विकेट्स घेतल्या आहेत.





मागील विजयामुळे आत्मविश्वास

जोबर्ग सुपर किंग्सने त्यांच्या शेवटच्या लीग सामन्यात पार्ल रॉयल्सला 44 धावांनी हरवून प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले होते. कर्णधार जेम्स विन्स म्हणाला, 'हा एक नवीन दिवस आणि नवीन परिस्थिती आहे. मागील सामन्यातून आम्हाला नक्कीच आत्मविश्वास मिळाला आहे, पण एलिमिनेटर एक वेगळे आव्हान असेल.'

सामूहिक प्रयत्नांवर भर

विन्स म्हणाला की संघ कोणत्याही एका खेळाडूवर अवलंबून राहिला नाही. वेगवेगळ्या खेळाडूंनी वेगवेगळ्या वेळी योगदान दिले आहे. हीच आमची ताकद राहिली आहे.

पार्ल रॉयल्सही सज्ज

पार्ल रॉयल्सचा फलंदाज डॅन लॉरेन्सच्या मते, त्यांच्या संघाने मागील सामन्यात खराब क्रिकेट खेळले नव्हते.

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...

### किशोरी पेडणेकरांच्या आक्रमक प्रश्नावर माधुरी मिसाळांनी एका वाक्यात विषय संपवला



मुंबई - महापालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणावरून निर्माण झालेल्या वादावर आता सत्ताधाऱ्यांकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. शिवसेना उबठा गटाने केलेल्या आरोपांना उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी ठाकरे गटाचे आरोप नियमबाह्य आणि दिशाभूल करणारे असल्याचं म्हटलं आहे. आरक्षण प्रक्रिया ही पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत पार पडली असून त्यामध्ये कोणताही अन्याय किंवा पक्षपात झालेला नाही, असा दावा त्यांनी केला. मुंबई महापालिकेत यावेळी खुल्या प्रवर्गातील महिला महापौर होणार असल्याचं स्पष्ट करत त्यांनी सर्व प्रक्रिया शासन नियमांनुसार झाल्याचं सांगितलं.माधुरी मिसाळ यांच्या या स्पष्टीकरणानंतर ठाकरे गटाकडून पुन्हा तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. शिवसेना उबठा गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी खुल्या प्रवर्गातील महिला महापौर करण्यावर आक्षेप नोंदवला आहे. त्यांच्या मते, या निर्णयामुळे अनुसूचित जमाती (ST) आणि ओबीसी प्रवर्गातील महिलांवर अन्याय होत आहे. मुंबई महापालिकेत या प्रवर्गातील महिला नगरसेवक असतानाही त्यांना संधी दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. हा निर्णय सामाजिक न्यायाच्या तत्वांवर घाला घालणारा असल्याचंही पेडणेकर यांनी स्पष्ट केलं.

### मुंबईत सरकारने ST प्रवर्गाला डावलले



मुंबई - राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात पार पडली. या सोडतीनंतर अनेक महापालिकांमधील आरक्षण स्पष्ट झालं असलं, तरी मुंबई महापालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. मुंबईच्या आरक्षण सोडतीत पारदर्शकता नसल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी राज्य सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर थेट निशाणा साधला आहे. ही सोडत ठरावीक राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन काढण्यात आल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.किशोरी पेडणेकर यांनी सर्वात मोठा मुद्दा अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाबाबत उपस्थित केला आहे. मुंबई महापालिकेत ST प्रवर्गातून दोन नगरसेवक निवडून आले असताना, महापौरपदाच्या आरक्षणासाठी चिठ्ठी काढताना हा प्रवर्ग वगळण्यात का आला, असा थेट सवाल त्यांनी केला. जर ST प्रवर्गाचे नगरसेवक महापालिकेत आहेत, तर मग त्या प्रवर्गासाठी आरक्षण का ठेवण्यात आलं नाही? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. महायुतीकडे ST प्रवर्गातील नगरसेवक नसल्यामुळेच हा प्रवर्ग जाणीवपूर्वक बाजूला ठेवण्यात आला का, असा संशयही त्यांनी व्यक्त केला.पेडणेकर यांनी पुढे आरोप केला की, आदिवासी प्रवर्गाला डावलण्यासाठी अचानक नियम बदलण्यात आले. यापूर्वी अशी कोणतीही अट नसताना, अचानक आदिवासी प्रवर्गासाठी किमान तीन जागा असाव्यात असा निकष लावण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. हा नियम केवळ मुंबईपुरताच का लावण्यात आला.

# अकोल्यातील हुंडीवाले हत्येप्रकरणी निवृत्त पोलिस अधिकाऱ्यासह 10 जणांना जन्मठेप

## अकोला जिल्हा न्यायालयाचा निकाल, पुराव्याअभावी 5 जणांची निर्दोष सुटका

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

अकोला : गवळी समाजाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किसनराव हुंडीवाले हत्या प्रकरणात सेवानिवृत्त पोलिस अधिकारी श्रीराम गावंडेसह १० आरोपींना अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पाच जणांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. साडेसहा वर्षांनंतर बुधवारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला.

६ मे २०१९ रोजी धर्मादाय आयुक्त कार्यालयात एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी आले असताना संस्थेच्या सभासद नोंदणी आणि मालमत्तेच्या वादातून दुपारी पावणेबाराच्या सुमारास किसनराव हुंडीवाले यांची क्रूरपणे हत्या केली होती. यात १५ जणांवर गुन्हा दाखल झाला होता.

**तिघांची साक्ष पूरक ठरल्याने गुन्हा सिद्ध**

या घटनेतील मृत किसनराव हुंडीवाले यांचे पुत्र प्रवीण किसनराव हुंडीवाले, फिर्यादीचे वकील ॲड. नरेंद्र धूत आणि पोलिस कॉन्स्टेबल राजेश वानखडे यांची साक्ष न्यायालयाने ग्राह्य धरली. आरोपींनी हुंडीवालेंच्या डोक्यात अग्निशमन यंत्राने वार केले. त्यांच्या डोळ्यात टोचे घालून क्रूर पद्धतीने हत्या केल्याचे सबळ पुराव्यानिशी ॲड. उज्ज्वल निकम यांनी सिद्ध केले. यात तीन प्रत्यक्ष साक्षीदारांच्या साक्ष एकमेकांना पूरक ठरल्या. घटना घडल्यानंतर तातडीने किसनराव हुंडीवाले यांचे पुत्र प्रवीण हुंडीवाले यांनी शहरातील एका दूरचित्र वाहिनीला दिलेली मुलाखत न्यायालयाने ग्राह्य धरली.



# एकनाथ शिंदेंची बार्गेनिंग पॉवर 2 दिवसांत कळेल

## सतेज पाटलांचा टोला; मुंबईच्या महापौर पदाचा निर्णय दिल्लीत होणार असल्याचा दावा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



मुंबई - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेत किती बार्गेनिंग पॉवर शिल्लक आहे हे पुढील दोन दिवसांत कळेल, असे काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी म्हटले आहे. मुंबई महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाले आहे. पण हे पद कुणाला द्यायचे याचा निर्णय दिल्लीतच होणार आहे. तिथे शिंदे गटाची बार्गेनिंग पॉवर कळेल, असे ते म्हणाले.आज मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत झाली. या सोडतीनंतर कोल्हापुरात बोलताना सतेज पाटील म्हणाले, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटले आहे. पण मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय दिल्लीतच होईल. सत्ताधारी शिवसेना किती दबावाखाली आहे हे मागील 2-3 दिवसांत घडलेल्या घटनांवरून दिसून येते. शिंदेग टाची बार्गेनिंग पॉवर अजून शिल्लक आहे का? हे दोन दिवसांत कळेल. कोल्हापूर महापालिकेचे महापौरपदही शिवसेनेला मिळणार नाही. मिळालेच तर त्यांचे अभिनंदन करायला हवे.ते पुढे म्हणाले, महापालिका निवडणुकीनंतर महापौर पदाचे आरक्षण असा प्रकार पहिल्यांदाच घडत आहे. नियम व कायदे सरकार म्हणेल तसे सुरू आहे. आज सोडत झालेले महापौर पदाचे आरक्षण मागील आरक्षण पाहून झाले आहे का? याची खात्री कोर्टाने केली पाहिजे. जिल्हा परिषदांच्या आरक्षणावेळी हा विचार झाला नव्हता. कोल्हापूर महापालिकेत शिंदे गटाला महापौर पद मिळणार नाही. यदाकदाचित त्यांना मिळाले तर त्यांचे कौतुकच करायला हवे. महायुतीमधील घटकपक्ष अनेक ठिकाणी निवडणूकपूर्व व निवडणूकीनंतर युती करून एकत्र आलेत. त्यामुळे महापौर निवडीत काही गडबड होईल असे वाटत नाही.कोल्हापूर व इचलकरंजी या दोन्ही ठिकाणी ओबीसी आरक्षण पडले आहे. आता दोन्ही ठिकाणी मूळ भाजपचा महापौर होणार की नव्याने भाजपमध्ये आलेला महापौर होणार याची उत्सुकता कोल्हापूरकरांना लागली आहे. 20 वर्षे आमच्यविरोधात लढलेल्या कार्यकर्त्याला पद मिळते की नवख्याला? हे आम्हालाही पाहायचे आहे,

# अकोल्यात भाजपला रोखण्यासाठी रणनीती

## प्रकाश आंबेडकरांच्या निवासस्थानी विरोधकांची खलबतं

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



अकोला महानगरपालिकेत 38 जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी आवश्यक असलेला 41 चा आकडा गाठण्यापूर्वीच त्यांना रोखण्यासाठी शहरात 'हाय व्होल्टेज' राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी एमआयएम, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या नेत्यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. यामुळे अकोल्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून सत्तास्थापनेसाठी आता सर्वच विरोधक एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या रणनीतीचा भाग म्हणून काँग्रेसचे आमदार साजिद खान आणि प्रकाश आंबेडकर यांच्यात बंद दाराआड महत्त्वाची बैठक पार पडली, ज्यामध्ये एमआयएम आणि दोन्ही राष्ट्रवादीचे नेतेही सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, 21 नगरसेवक असलेल्या काँग्रेसने भाजपला रोखण्यासाठी मोठी तडजोड करण्याची तयारी दर्शवली आहे. आम्हाला सत्तेत कोणतेही पद नको, मात्र भाजपेतर सत्ता स्थापन व्हावी, असा स्पष्ट प्रस्ताव काँग्रेसने ठाकरे गटासमोर आणि इतर मित्रपक्षांसमोर ठेवला आहे. विरोधकांच्या या संभाव्य मोर्चेबांधणीमुळे अकोल्यात भाजपची सत्तास्थापनेची वाट बिकट होण्याची चिन्हे दिसत आहेत.अकोला महानगरपालिकेत सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी सध्या राजकीय पेच निर्माण झाला असून 'वंचित' आणि ठाकरे गट आता 'किंगमेकर'च्या भूमिकेत आले आहेत. 80 सदस्यीय महापालिकेत बहुमत गाठण्यासाठी 41 जागांची आवश्यकता असताना, 38 जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, त्यांना बहुमतापासून रोखण्यासाठी काँग्रेसने कंबर कसली असून आमदार साजिद खान पठाण यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या उभय नेत्यांमध्ये तब्बल 45 मिनिटे बंद दाराआड चर्चा झाली, ज्यामध्ये 5 नगरसेवक असलेल्या वंचितचा पाठिंबा मिळवण्यासाठी काँग्रेसने आग्रही विनंती केली आहे.दुसरीकडे, भाजपने सत्ता स्थापनेसाठी 6 नगरसेवक असलेल्या ठाकरे गटाला आधीच 'ऑफर' दिली होती, ज्याला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसनेही ठाकरे गटासमोर मोठा प्रस्ताव ठेवला आहे. 21 जागा असलेली काँग्रेस आता प्रकाश आंबेडकरांच्या साथीने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. अकोल्यात कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने, आता वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना ठाकरे गट नेमकी कोणाची पाठराखण करणार, यावर अकोला महापालिकेच्या सत्तेचे भवितव्य अवलंबून आहे.

# इंदापूरमध्ये राजकीय विरोधक एकत्र:दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटलांची हातमिळवणी, 'घड्याळ' चिन्हावर पुढच्या पिढीला संधी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई - राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस असून मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील कट्टर विरोधक असलेले कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील एकत्र आले असून 'घड्याळ' चिन्हावर समर्थकांचे उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यानंतर मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले, हर्षवर्धन पाटील आणि आम्ही एकत्र निवडणूक लढतो आहोत. आगामी काळात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून येतील, असा विश्वास भरणे यांनी व्यक्त केला आहे. तसेच मुलगा श्रीराज भरणे यांना देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले असून यावर देखील भरणे यांनी भाष्य केले आहे.मुलगा श्रीराज भरणे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून यावर बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले, माझ्या मुलाचे कॉलेज नुकतेच संपले आहे. तो नेहमीच समाजकार्यात भाग घेतो. लोकांना सहकार्य करतो, मोठेमोठे शिबीर भरवतो. 8 दिवसांपूर्वीच त्याने दिव्यांग वधू-वर मेळावा आयोजित केला होता. त्याला निवडणूक लढवण्याची इच्छा नव्हती. पण कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे त्याने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने फॉर्म भरला असल्याची माहिती भरणे यांनी दिली आहे.दरम्यान, या निवडणुकीच्या माध्यमातून इंदापूर तालुक्यातील नेत्यांनी आपल्या पुढील पिढीला



राजकारणाच्या रिंगणात उतरवले असल्याचे दिसून आले आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील यांनी बावडा-लुमेवाडी जिल्हा परिषद गटातून 'घड्याळ' चिन्हावर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आप्पासाहेब जगदाळे यांचे चिरंजीव यशराज जगदाळे यांनी वडापुरी-माळवाडी गटातून उमेदवारी दाखल केली आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी इंदापूरमध्ये पुन्हा आघाडी केली आहे. तसेच अनुभवी नेत्यांसोबतच नव्या पिढीला संधी देत संघटन मजबूत करण्यावर भर दिल्याचे दिसून येत आहे. दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील हे राजकीय विरोधी असून या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आले आहेत. त्यामुळे, आता या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस भाजपला मागे टाकत चांगली कामगिरी करणार का, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# महापौर आरक्षणावर राजकीय गणितं बदलली

## 29 महापालिकांची संपूर्ण यादी समोर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई - राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले असून, या सोडतीमुळे राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही आरक्षण सोडत पार पडली. 50 टक्के महिला आरक्षणाचा नियम लागू केल्यामुळे यंदा तब्बल 15 महानगरपालिकांमध्ये महिला महापौर विराजमान होणार असून, उर्वरित 14 ठिकाणी सर्वसाधारण प्रवर्गाला संधी मिळणार आहे. राज्यातील महत्त्वाच्या चार महापालिका – मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर – यांच्या आरक्षणाकडे विशेष लक्ष लागले होते. या




चारही महापालिकांमधील आरक्षण जाहीर होताच स्थानिक राजकीय समीकरणे स्पष्ट होऊ लागली आहेत.

राज्यातील सर्वात मोठी आणि आर्थिक राजधानी असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत (BMC) महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे मुंबईच्या राजकारणात महिला नेतृत्वाला मोठी संधी मिळाली आहे. महिला आरक्षणामुळे प्रमुख पक्षांमध्ये इच्छुक महिला नगरसेविकांची नावे पुढे येऊ लागली असून, पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे.

# बीडमध्ये माणुसकीला काळिमा!:जिल्हा रुग्णालयाचा निर्दयी कारभार, वयोवृद्ध आजीला दरवाजासमोर झोपवत कर्मचारी पसार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

बीड जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेल्या वयोवृद्ध आजारी महिला रुग्णाला अत्यंत निर्दयी वागणूक देण्यात आल्याचे समोर आले आहे. सोनोग्राफीसाठी आलेल्या या महिलेला दाराच्या बाहेर झोपवत चक्क दार बंद करून कर्मचारी निघून गेले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर देखील चांगलाच व्हायरल झाला असून या प्रकारावर संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनोग्राफीसाठी गेलेल्या आजी या जिल्हा रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर ॲडमिट होत्या. त्यांना डॉक्टरांनी सोनोग्राफीसाठी पाठवले होते. रुग्णालयाची लिफ्ट बंद असल्यामुळे तिसऱ्या मजल्यावरून काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना स्ट्रेचरवर उचलून खाली आणले. सायंकाळी 6 वाजण्यापूर्वीच या आजी सोनोग्राफी सेंटरच्या समोर हजर होत्या. पण येथील महिला कर्मचाऱ्याने पावणे सहा वाजताच दरवाजा बंद केला. दरवाजासमोर त्या आजी खाली झोपलेल्या असताना देखील त्यांच्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करत या महिलेने दरवाजा बंद केला.

या घटनेनंतर या महिलेला जाब विचारला असता आजीच्या नातेवाईकांना उर्मटपणे बोलणे सुरू केले. तसेच समोर आजी झोपलेली असताना सुद्धा ही महिला निघून गेली. या घटनेमुळे बीड जिल्हा रुग्णालयातील कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच माणुसकी मेली आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.



दरम्यान, घडलेल्या प्रकरणी आपण चौकशी केली असून कर्तव्यात कसूर करणाऱ्या परिचारिकेसह डॉक्टरांची चौकशी करून योग्य कारवाई केली जाईल, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके यांनी दिली आहे.